रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २९२
www.ramprahar.com

शुक्रवार, १० मे २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

पनवेलमध्ये वासुदेवाकडून मतदान जनजागृती/२
रायगडातील २८ धरणांत ३२.४२ टक्के पाणीसाठा/५
भारतीय महिला क्रिकेटपटूंनी बांगलादेशात रचला इतिहास/८

## हिंदूंची लोकसंख्या घटली; परिषदेचा अहवाल

**नवी दिल्ली** : भारतात १९५० ते २०१५ या काळात बहुसंख्य असलेल्या आणि प्रमुख धर्म असलेल्या हिंदूंच्या लोकसंख्येत ७.८ टक्क्यांची घसरण दिसून आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्थापन केलेल्या आर्थिक सल्लागार परिषदेने धार्मिक लोकसंख्येनुसार एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यानुसार हिंदूंसह जैन व पारशी यांचीही लोकसंख्या कमी झाली आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येतील हिंदूंचा वाटा १९५० साली ८४ टक्के इतका होता. तो २०१५ साली कमी होऊन ७८ टक्क्यांपर्यंत कमी झाला, तर मुस्लीम धर्मीय लोकसंख्येचा वाटा १९५० साली ९.८४ टक्के इतका होता. त्यामध्ये आता वाढ होऊन ही संख्या १४.०९ टक्क्यांवर पोहचली आहे. १९५० ते २०१५ या काळात मुस्लीम लोकसंख्येमध्ये ४३.१५ टक्क्यांची वाढ, ख्रिश्चन लोकसंख्येत ५.३८ टक्के वाढ, शीख लोकसंख्येत ६.५८ टक्क्यांची वाढ दिसली आहे, तर बौद्ध धर्मीय लोकसंख्येत किंचीत वाढ नोंदविली गेली आहे.

# बॉम्बस्फोटातील आरोपी 'मविआ'च्या रॅलीत

## ■ भाजप आमदाराकडून व्हिडीओ पोस्ट करून टीका



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईत २० मे रोजी लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान प्रक्रिया होणार आहे. त्या निमित्ताने मुंबईत प्रचारसभेला वेग आला आहे. अशातच मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार अमोल कीर्तिकर यांच्या प्रचारासाठी मुंबईतील १९९३च्या बॉम्बस्फोटातील आरोपींपैकी एक इब्राहिम मूसाही सामील झाला होता, असा दावा भाजप आमदार अमित साटम यांनी केला आहे. त्यांनी एक्सवर या संदर्भातील व्हिडीओही पोस्ट केला आहे.

भाजप आमदार अमित साटम यांनी बुधवारी सायंकाळी अंधेरी पश्चिम येथील निवडणूक प्रचारात मूसाने हजेरी लावल्याचा दावा करीत अमोल किर्तीकर आणि काँग्रेसवर टीका केली. १९९३च्या बॉम्बस्फोटचा आरोपी इकबाल मुसा उर्फ बाबा चौहान हा उत्तर पश्चिमच्या महाविकास आघाडीचे उमेदवार अमोल किर्तीकर यांच्या प्रचारार्थ आणि समर्थनार्थ फिरताना दिसत आहे. मुंबईकरांचे जीव घेणाऱ्या आतंकवाद्यांचे समर्थन महाविकास आघाडीचे उमेदवार घेताना दिसत असून ही लढाई राष्ट्रवादी शक्ती आणि तुकडे तुकडे गँग यांच्यात आहेच, परंतु ही लढाई भारत आणि पाकिस्तानची लढाई झालेली आहे, असे आमदार साटम यांनी म्हटले आहे.

बाबा चौहान या नावाने ओळखला जाणारा मूसा हा १९९३च्या मुंबई बॉम्बस्फोट खटल्यातील दोषी आहे. साखळी बॉम्बस्फोटापूर्वी अभिनेता संजय दत्तच्या घरी शस्त्रे नेल्याचा आरोप त्याच्यावर आहे. या साखळी बॉम्बस्फोटांमध्ये २५७ लोकांचा मृत्यू झाला होता आणि ७००हून अधिक जण जखमी झाले होते.

# पंतप्रधान मोदींसोबत काम करण्याची पुन्हा संधी द्या -खासदार श्रीरंग बारणे




**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

देशातील सर्व तरुणांना रोजगार आणि प्रत्येकाच्या हाताला काम मिळाले पाहिजे याची पूर्ण जबाबदारी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घेतली आहे. सर्वसामान्य नागरिकांसह महिलांना सन्मान देण्याचे काम पंतप्रधान मोदींनी केले आहे. त्यामुळे आपल्या देशाला विकासाच्या दिशेने नेण्यासाठी आणि जागतिक पातळीवर महासत्ता बनवण्यासाठी मोदीजींना पुन्हा पंतप्रधान, तर मावळ लोकसभा मतदारसंघातून विजयाची हॅट्ट्रिक करून त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मला द्या, असे आवाहन महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी कळंबोलीत केले. ते जाहीर सभेत बोलत होते.

भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, आरपीआय, मनसे आणि मित्रपक्ष महायुतीचे मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ महायुतीच्या वतीने कळंबोली सेक्टर ११मधील एमएसईबी मैदानात जाहीर सभेचे आयोजन बुधवारी (दि. ८) करण्यात आले होते. या सभेला नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांना मिळत असलेला प्रतिसाद पाहता त्यांचा विजय निश्चित झाला असल्याचा विश्वास व्यक्त केला तसेच येत्या १३ तारखेला आपला मतदानाचा हक्क बजावून खासदार श्रीरंग बारणे यांना प्रचंड मतांनी विजयी करा, असे आवाहन केले. (पान २ वर..)



**पनवेल : महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी खारघरपासून कळंबोलीपर्यंत भव्य रोड शोचे आयोजन बुधवारी करण्यात आले होते. या वेळी प्रमुख नेते, पदाधिकारी उपस्थित होते, तर महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर मोटरसायकलवर स्वार होऊन कार्यकर्त्यांसमवेत सहभागी झाले होते.** **(वृत्त पान ३ वर..)**

# नरेश म्हस्के यांची नवी मुंबईत प्रचार रॅली

## मुख्यमंत्र्यांसह महायुतीच्या नेत्यांचा सहभाग




**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांची प्रचार रॅली गुरुवारी (दि. ९) नवी मुंबईत आयोजित करण्यात आली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या रॅलीत सहभागी घेतला.

रॅलीत माजी मंत्री व विद्यमान आमदार गणेश नाईक, आमदार मंदा म्हात्रे, माजी खासदार संजीव नाईक, माजी आमदार संदीप नाईक, माजी महापौर सागर नाईक, शिवसेना उपनेते विजय नाहटा, जिल्हाप्रमुख विजय चौगुले, संपर्कप्रमुख किशोर पाटकर, महानगरप्रमुख अशोक गावडे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष नामदेव भगत, मनसेचे शहराध्यक्ष गजानन काळे, आरपीआयचे सिद्राम ओहोळ, महेश खरे, यशपाल ओहोळ, रासप जिल्हाध्यक्ष निलेश भिसे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## राज्यात अवकाळी पावसाच्या सरी

**वाशिम : प्रतिनिधी**

राज्यातील कोकण वगळता इतर विभागातील बहुतांश जिल्ह्यात गुरुवारी (दि. ९) अवकाळी पाऊस पडला. उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना या पावसाने काहीसा दिलासा मिळाला आहे, मात्र हा पाऊस शेतकऱ्यांची चिंता वाढवणारा आहे.

वाशीम जिल्ह्याच्या मंगरुळपीर तालुक्यातील जांब गावात वीज पडून दुर्गा कांबळे (वय १४) या बालिकेचा मृत्यू झाला, तर रविना सुर्वे गंभीर जखमी झाली. जखमी मुलीला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## निवडक

### डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या खटल्याचा आज निकाल

**पुणे** : अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्या प्रकरणाचा निकाल शनिवारी (दि. १०) जाहीर करण्यात येणार आहे. या खटल्यात पाच जणांवर आरोप निश्चिती करण्यात आली आहे.



डॉ. दाभोलकर यांची पुण्यात २० ऑगस्ट २०१३ रोजी सकाळी पिस्तुलातून गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती.

### सुरेशदादा जैन यांचा राजकारणातून संन्यास

**जळगाव** : माजी मंत्री तथा आमदार सुरेशदादा जैन यांनी सक्रिय राजकारणातून निवृत्ती घेत असल्याचे जाहीर केले आहे. त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्राथमिक सदस्यतेचा राजीनामा दिला आहे. इथून उर्वरित आयुष्यात राजकारणात कोणताही सहभाग घेणार नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे. जैन १९७४पासून सतत राजकारणात होते. १९८०पासून सक्रिय राजकारणात प्रवेश केल्यानंतर ते जवळपास ३४ वर्ष आमदार होते. त्यानंतर ते मंत्रीही झाले.

# कर्मवीर अण्णांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



**सातारा : रामप्रहर वृत्त**

आशिया खंडातील सर्वांत मोठी शिक्षण संस्था असलेल्या रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील अर्थात कर्मवीर अण्णा यांच्या ६५व्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीस गुरुवारी (दि.९) विनम्र अभिवादन करण्यात आले. सातारा येथे रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली हा सोहळा पार पडला.

या सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, व्हाईस चेअरमन भगीरथ शिंदे, संघटक डॉ. अनिल पाटील, खासदार श्रीनिवास पाटील, मॅनेजिंग कौन्सिलचे ज्येष्ठ सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे सचिव विकास देशमुख, आमदार बाळासाहेब पाटील, आमदार विश्वजीत कदम, आमदार शशिकांत शिंदे, आमदार सुमन पाटील, भारती विद्यापीठाचे कुलपती शिवाजी कदम, जयश्रीताई चौगुले, मीनाताई जगधने, महेंद्र लाड, ॲड. दिलावर मुल्ला, जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, महेंद्र घरत, संजीव पाटील, जे.के. जाधव, राम गाडगे, राजेंद्र फाळके, ज्योत्स्ना ठाकूर आदी पदाधिकारी आणि रयतसेवक हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.

प्रारंभी समाधीस्थळ, कर्मवीर अण्णा आणि रयत माऊली यांच्या पुतळ्यास अभिवादन करून आदरांजली अर्पण करण्यात आली. **(पान २ वर..)**

# उद्धव ठाकरेंना मानसोपचारतज्ज्ञाची गरज

**छत्रपती संभाजीनगर** : माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलेल्या टीकेला भाजप नेते तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर देत उद्धव ठाकरेंना मानसोपचारतज्ज्ञाची गरज आहे, असे म्हटले आहे तसेच पराभव स्पष्ट दिसू लागल्याने ते अशा प्रकारे बोलत आहेत, असा टोलाही लगावला आहे.



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रत्युत्तर

पिंपरी-चिंचवडच्या सभेत उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर अश्लाघ्य भाषेत टीका केली होती. त्यावर पत्रकारांशी बोलताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, जनतेने उद्धव ठाकरेंना नाकारले आहे आणि म्हणून ते शिवीगाळ करण्यावर उतरले आहेत.




# रायगड मतदारसंघाची मतदान यंत्रे कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत



**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड लोकसभा मतदारसंघाच्या अंतर्गत येणाऱ्या पेण, अलिबाग, श्रीवर्धन, महाड, गुहागर व दापोली या विधानसभा मतदारसंघामध्ये मतदानाची प्रक्रिया पार पडली. यानंतर सर्व मतदान केंद्रावरील मतदान यंत्रे अलिबाग येथील जिल्हा क्रीडा संकुल या ठिकाणी तयार करण्यात आलेल्या स्ट्राँग रूममध्ये सुरक्षितपणे ठेवण्यात आल्या आहेत.

स्ट्राँग रूमच्या सुरक्षेकरिता निवडणूक आयोगाने ठरवून दिलेल्या मानकाप्रमाणे सुरक्षा बंदोबस्त व्यवस्था करण्यात आली आहे. त्या ठिकाणी त्रिस्तरीय सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. संपूर्ण बंदोबस्त व्यवस्थेचे प्रभारी अधिकारी म्हणून विनीत चौधरी (उपविभागीय पोलीस अधिकारी, अलिबाग) यांना नियुक्त करण्यात आले आहे. पहिल्या स्तरामध्ये केंद्रीय सशस्त्र दल (सीआरपीएफ) ११३ बटालियन जी कंपनीचे एक प्लाटून नेमण्यात आले आहे. या प्लाटूनमधील सशस्त्र जवान स्ट्राँग रूमच्या जवळच्या सर्वांत आतील कॉर्डन १मध्ये असतील व त्यांची स्ट्राँग रूमवर २४ तास नजर असेल तसेच स्ट्राँग रुममध्ये लावण्यात आलेल्या सीसीटीव्हीचे कंट्रोल रूम त्यांच्या ताब्यात असेल.

दुसऱ्या स्तरामध्ये राज्य सशस्त्र दल (एसआरपीएफ) ग्रुप ८, मुंबई येथील एक प्लाटून नेमण्यात आले आहे. या प्लाटूनमधील सशस्त्र जवान स्ट्राँग रुमच्या जवळच्या कॉर्डन २मध्ये असतील व त्यांची कॉर्डन १च्या बाहेरील परिसरामध्ये २४ तास पेट्रोलिंग असेल तसेच यातील वॉच टॉवरवर तैनात जवान आजुबाजूच्या परिसरावर नजर ठेवून असतील. तिसऱ्या स्तरामध्ये रायगड पोलीस दलातील सहा अधिकारी व ४० पोलीस अंमलदार यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामध्ये सशस्त्र अंमलदारांचाही समावेश असेल. हे अंमलदार स्ट्राँग रूमच्या जवळच्या कॉर्डन ३मध्ये असतील व त्यांची कॉर्डन २च्या बाहेरील परिसरात तसेच जिल्हा क्रीडा संकुलाच्या आजुबाजूच्या संपूर्ण परिसरामध्ये २४ तास गस्त असेल. **(पान २ वर..)**

### कर्नाळा बँक घोटाळा प्रकरण

## विवेक पाटीलांच्या जामिनावर आता २० जून रोजी सुनावणी

**पनवेल : प्रतिनिधी**

कर्नाळा बँक घोटाळा प्रकरणातील आरोपी विवेक पाटील यांच्या जामीन अर्जावर आता २० जून रोजी सुनावणी होणार आहे. शेकापचे माजी आमदार आणि कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष असलेल्या विवेक पाटील यांना सुमारे साडेपाचशे कोटी रुपयांच्या घोटाळाप्रकरणी तीन वर्षांपूर्वी ईडीने अटक केली होती.



विवेक पाटील यांनी जामिनासाठी अर्ज केला असला तरी त्यांचा तुरूंगातील मुक्काम वाढतच चालला आहे. आता त्यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी न्या. पृथ्वीराज चव्हाण यांच्यासमोर २० जून रोजी होणार आहे.

उच्च न्यायालयात बुधवारी (दि. ८) न्या. चव्हाण यांच्यासमोर झालेल्या सुनावणीत पुढील तारीख देण्यात आली. विवेक पाटील यांच्यातर्फे ॲड. राहुल ठाकूर आणि ईडीतर्फे ॲड. सुनील गोन्सालाविस यांच्या सहाय्यक उपस्थित होत्या.

# देश फाळणीच्या काँग्रेसी षडयंत्रात ‘उबाठा’ही सहभागी

## भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांचा हल्लाबोल

**मुंबई : प्रतिनिधी**

हिंदु समाजातील उपेक्षित, वंचितांना संविधानाने दिलेले आरक्षण काढून घेऊन मुस्लिमांना बहाल करणे, मुस्लिम समाजातील तिहेरी तलाक पद्धत पुन्हा लागू करणे, सीएए कायदा रद्द करणे, काश्मीरचे स्वतंत्र अस्तित्व कायम राखणारे कलम ३७० पुन्हा लागू करणे आणि देशात वांशिक वाद पेटवून एकसंध असलेल्या हिंदू समाजात दुफळी माजविणे या मुद्द्यांवर काँग्रेसप्रणीत इंडी आघाडीचा किमान समान कार्यक्रम निश्चित झाला आहे. देशाला दुसऱ्या फाळणीकडे नेण्याच्या या षडयंत्राला उद्धव ठाकरे यांचीही मान्यता आहे, असा हल्लाबोल भाजपचे प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी गुरुवारी (दि.९) केला. भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत उपाध्ये बोलत होते. या वेळी भाजप प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन उपस्थित होते.



उपाध्ये म्हणाले की, कर्नाटकातील काँग्रेस सरकारने ओबीसी समाजाचे आरक्षण रद्द करून मुस्लिमांचा समावेश ओबीसींमध्ये केला आणि संपूर्ण आरक्षण मुस्लिम समाजास बहाल केले. ही तर समाजात फूट पाडण्याची आणि धर्माच्या आधारावर आरक्षण नीती आखण्याची संविधानास मान्य नसलेल्या कृतीची पहिली पायरी होती. हिच नीती देशात सर्वत्र लागू करण्याचे काँग्रेसचे धोरण असून इंडी आघाडीत सहभागी असलेल्या सर्व पक्षांना ते मान्य असल्यामुळेच या धोरणानुसार एकत्र येण्याचे या आघाडीतील पक्षांनी ठरविले आहे. यातून देश दुसऱ्या फाळणीकडे जाईल, याची पर्वा काँग्रेस आणि इंडी आघाडीला नाही. दुर्दैवाने प्रखर राष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्या वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे पुत्र उद्धव यांनीही मतांसाठी या कटाला मान्यता दिली आहे. या आघाडीच्या स्थापनेसाठी वारंवार झालेल्या बैठकांमध्ये हाच किमान समान कार्यक्रम ठरविण्यात आला असून सर्वांच्या संमतीनुसार आता यातील एकएक मुद्दे जाणीवपूर्वक उपस्थित केले जात आहेत.

काँग्रेसच्या विदेशी काँग्रेस शाखेचे अध्यक्ष सॅम पित्रोदा यांनी देशातील सामाजिक वर्णभेदाविषयी केलेले निषेधार्ह वक्तव्य हे इंडी आघीडीतील उबाठा गटासह सर्वांनी निश्चित केलेल्या धोरणाचाच भाग आहे, त्यामुळे उबाठा सेनेचे ठाकरे त्यावर मौन पाळणार हे सहाजिकही आहे असेही ते म्हणाले.

# यंदाचा वाढता उन्हाळा ठरतोय धोकादायक!

## राज्यात उष्माघाताचे आतापर्यंत २०२ रुग्ण

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यात उन्हाळ्याची तीव्रता वाढल्याने उष्माघाताचे प्रकार वाढू लागले आहेत. यंदा उन्हाळ्यात आतापर्यंत उष्माघाताच्या २०२ रुग्णांची नोंद झाली आहे. राज्यात सर्वाधिक २३ रुग्णांची नोंद नाशिक जिल्ह्यात झाली असून, पुण्यातही सात रुग्ण आढळले आहेत.

राज्यात १ मार्च ते ५ मे या कालावधीत उष्माघाताच्या २०२ रुग्णांची नोंद झाली. बुलडाणा २१, जालना व धुळे प्रत्येकी २०, सोलापूर १८ आणि सिंधुदुर्ग १० अशी रुग्णसंख्या आहे. राज्यात यंदा उष्माघाताने मृत्यू झाल्याची नोंद नाही. राज्यात गेल्या वर्षी १ मार्च ते ३१ जुलै या कालावधीत उष्माघाताने २२ जणांचा मृत्यू झाला होता. त्यातील सर्वाधिक १३ मृत्यू औरंगाबाद जिल्ह्यातील होते, अशी माहिती आरोग्य विभागाने दिली.

आरोग्य विभागाने सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक आणि महापालिकांचे वैद्यकीय अधिकारी यांना उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. उष्णतेशी निगडित आजार वाढण्याची शक्यता असल्याने आरोग्य यंत्रणांना त्याबाबत उपचाराचे नियोजन करण्याची सूचना केली आहे.

या आजारांवरील औषधांचा पुरेसा साठा रुग्णालयांमध्ये ठेवण्यासही सांगण्यात आले आहे.



**उष्माघात रुग्णसंख्या**

| | |
|---|---|
| नाशिक – २३ | बुलडाणा – २१ |
| जालना – २० | धुळे – २० |
| सोलापूर – १८ | सिंधुदुर्ग – १० |

# पेणमध्ये अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार

## गुन्हा दाखल; आरोपीला अटक

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील वडखळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत नारवेल बेनवलेबेडी येथील आरोपीने अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीविरोधात पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यातील आरोपीस रविवारी (दि.५) रोजी रात्रौ ९:२५ वा. च्या सुमारास अटक करण्यात आली.

याबाबत माहिती अशी की, नारवेल बेनवले बेडी येथील आरोपीने जुलै २०२३ ते २०२४दरम्यान फिर्यादींची पीडित मुलगी ही अल्पवयीन असल्याचा फायदा घेऊन तिच्याशी प्रथम मैत्री करून त्यानंतर प्रेमसंबंध निर्माण केले. तिला अनेक वेळा रात्रीचे वेळी भेटायला बोलवमन तिचा विनयभंग केला, तसेच मुंबई येथे पीडित मुलीला नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले.

याप्रकरणी वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश गवई हे करीत आहेत.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण करून अत्याचार

**मोहोपाडा** : रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये माडप येथील वाशिवली पारनेरकर महाराज येथे शिकत असलेल्या १७ वर्षीय मुलीला पळवून नेल्याची घटना घडली.

ही मुलगी ११वीचा रिझल्ट आणण्यासाठी गेली असताना तिला भिंगार येथील विवाहित तरूण अल्पेश सुरेश नाईक (वय २२) याने फूस लावून पळवून नेले. याबाबत रसायनी पोलीस ठाण्यात १७ वर्षीय मुलगी हरवल्याची तक्रार मुलीच्या आई–वडिलांनी रसायनी पोलीस ठाण्यात केली होती. त्यानंतर आरोपी अल्पेश नाईक याने त्या मुलीस दांडफाटा येथे मंगळवारी (दि. ७)आणून सोडले. या सहा दिवसात मुलीला अज्ञात ठिकाणी ठेवून आरोपी अल्पेश नाईक याने तिच्याबरोबर अत्याचार केले. याप्रकरणी आरोपी अल्पेश नाईक याला रसायनी पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुंबईतील सी–व्हिजिल ॲपवर प्राप्त तक्रारींचे निवारण

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीत आचारसंहितेच्या उल्लंघनाच्या तक्रारी नोंदवण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने सी–व्हिजिल हे ॲप सुरू केले आहे. नागरिकांना हवी असलेली माहिती मिळविणे आणि तक्रारी नोंदविण्यासाठी नॅशनल ग्रीव्हन्स सर्व्हिस पोर्टल कार्यान्वित केले आहे. सी–व्हिजिल ॲपच्या माध्यमातून मुंबई शहर जिल्ह्यांतर्गत असलेल्या लोकसभा मतदारसंघात १६ मार्च ते ५ मेपर्यंत १२३ तक्रारी प्राप्त झाल्या. या सर्व तक्रारींचे जिल्हा निवडणूक विभागाकडून निवारण करण्यात आले आहे, तसेच एनजीएसपी पोर्टलवर नागरिकांच्या कॉल्सची तत्काळ दखल घेतली जात आहे.




निवडणुकीदरम्यान होणाऱ्या आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करणाऱ्या अनुचित प्रकारांची तक्रार या ॲपच्या माध्यमातून थेट ऑनलाईन करता येते. जिल्ह्यात कुठेही आचारसंहितेचे उल्लंघन होत असेल तर नागरिकांनी तेथील फोटो काढावा आणि तत्काळ सी व्हिजील ॲपवर अपलोड करावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक विभागाकडून करण्यात आले आहे.

या तक्रारींवर अवघ्या १०० मिनिटांत कार्यवाही करण्यात येते. १६ मार्च ते ५ मेपर्यंत मुंबई दक्षिण मध्य लोकसभा मतदारसंघात ७२ तर मुंबई दक्षिण लोकसभा मतदारसंघात ५१ तक्रारी सी–व्हिजिल ॲपवर प्राप्त झाल्या होत्या. या सर्व तक्रारीचे निवारण करण्यात आले आहे.


https://ngsp.eci.gov.in/ या पोर्टलवर १६ मार्च ते ५ मे या कालावधीत मुंबई दक्षिण मध्य लोकसभा मतदारसंघात ८९३ तर मुंबई दक्षिण लोकसभा मतदारसंघात ८४८ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. यापैकी मुंबई दक्षिण मध्य लोकसभा मतदारसंघात ८३१ तर मुंबई दक्षिण लोकसभा मतदारसंघात ८३७ तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे. उर्वरित २८ तक्रारींबाबत कार्यवाही सुरू आहे, वरील ॲप/पोर्टलवर केलेल्या तक्रारीबाबत काय कार्यवाही झाली याची माहिती तक्रारदारास त्याचे लॉगीनमध्य पाहता येते अशी माहिती जिल्हा निवडणूक विभागाकडून दिली आहे.


# रसायनीतील वारद येथे अखंड भक्तीरसामृत यज्ञोत्सव

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा येथील वारद येथे तृतीय वर्षी अखंड भक्तीरसामृत यज्ञोत्सव आयोजन १२ ते १४ मे दरम्यान करण्यात येणार आहे. पहाटे काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायण, भजन, प्रवचन, हरिपाठ, कीर्तन, जागर भजन आदी कार्यक्रम या यज्ञोत्सवाच्या ठिकाणी होणार आहे, तसेच या ठिकाणी महाराष्ट्रातील थोर कीर्तनकार यांचे कीर्तन रोज रात्री ९ ते ११ कीर्तन होणार आहेत.

पहिल्या दिवशी प्रवचन हभप जयेश महाराज पाटील (वडगांव), रात्री हभप उल्हास महाराज सूर्यवंशी आळंदी यांचे किर्तन, हभप अक्षय महाराज चव्हाण, यांचे कीर्तन होणार आहे. दीपोत्सवाच्या माध्यमातून या कार्यक्रमांची सांगता होणार आहे. काल्याचे कीर्तन हभप रामदास महाराज पाटील गुरुकुल यांचे होणार असून, वारद येथील ग्रामस्थ मंडळ यांचे सहकार्य लाभणार आहे. सर्व धार्मिक कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.





**खालापूर : आपल्या देशाला महासत्ता बनविण्यासाठी भाजप आध्यात्मिक समन्वय आघाडीच्या वतीने बुधवारी मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ उंबरे येथे नमो संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता. या वेळी वारकरी संप्रदायातील अनेक ज्येष्ठ कीर्तनकार, प्रवचनाकारांनी उपस्थित राहून खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी संकल्प केला.**

# वासुदेवानी केली मतदान जनजागृती

## पनवेल महापालिकेच्या वतीने अभिनव उपक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४च्या पार्श्वभूमीवर स्वीप कार्यक्रमांतर्गत नागरिकांमध्ये मतदान जनजागृती करण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने अभिनव उपक्रम राबविला असून ‘मताचं दान करा’ म्हणत चारही प्रभागामध्ये वासुदेव मतदान जनजागृती करीत आहेत.

येत्या १३ मे रोजी मावळ लोकसभा मतदारसंघामधील १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघामध्ये निवडणुका होणार आहेत. यामध्ये नागरिकांच्या मतदानाचा टक्का वाढावा यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या वतीने विविध अभिनव उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदान जनजागृती केली जात आहे.

आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप पथक प्रमुख शहर अभियंता संजय जगताप यांच्या सूचनेनुसार नुकतेच महापालिकेने लोकपरंपरेतील वासुदेवाच्या माध्यमातून महापालिका क्षेत्रातील चारही प्रभागांतील नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यात येत आहे.



याचबरोबर मावळ लोकसभा मतदारसंघामधील १८८ पनवेल विधानसभा मतदारसंघांत आशासेविका बैठका घेऊन व घरोघरी जाऊन मतदान जनजागृती करीत आहेत, तसेच चारही प्रभागामध्ये महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून बाजारपेठांमध्ये व्यापाऱ्यांच्या दुकानांमध्ये जाऊन मतदान जनजागृतीपर पत्रकाचे वाटप करीत आहेत. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध प्रकारे जनजागृती करण्यात येत आहे.

पान १ वरुन

## पंतप्रधान मोदींसोबत काम करण्याची पुन्हा संधी द्या –खासदार श्रीरंग बारणे

या सभेला भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, पनवेल महापालिकेचे स्थायी समितीचे माजी सभापती अमर पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, मोनिका महानवर, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष महादेव पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, भाजपचे कळंबोली शहर अध्यक्ष रविशेठ पाटील, अशोक मोटे, बबन बारगजे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख परेश पाटील, तालुकाप्रमुख रूपेश ठोंबरे, मनसेचे राहुल चव्हाण, विवेक बोराडे, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस भिमसेन माळी, सचिन कुंभार, भाजप महिला मोर्चाच्या प्रिया मुकादम, कुंदा गोळे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. महिलांची उपस्थितीही लक्षणीय होती

## कर्मवीर अण्णांना पुण्यतिथीनिमित्त आदरांजली

या सोहळ्यात नूतनीकरण करण्यात आलेल्या कर्मवीर स्मृती भवनचे ऑनलाईन पद्धतीने खासदार शरद पवार यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले तसेच प्रथमच शैक्षणिक वर्षानुसार संपादित करण्यात आलेल्या कार्यदर्शिका, त्याचबरोबर संस्थेचा वार्षिक अहवाल, भौगोलिक नकाशा, रयत विज्ञान पत्रिका, संस्थेच्या विविध शाखांची माहिती असलेली पुस्तिका यांचेही प्रकाशन करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी सांगितले की, कर्मवीर अण्णांनी संस्थेची स्थापना संघर्षमय काळात केली. तेव्हा परिस्थिती वेगळी होती. आता त्यामध्ये खूप बदल झाला आहे आणि हा बदल अंगिकारून संस्था विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यासाठी कार्यरत आहे. दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात येतात. सध्या एआय या परिवर्तन प्रणालीचे जग आहे. त्यामुळे त्याचाही वापर आवश्यक झाला आहे. रयतसेवक आणि कार्यकर्ता संस्थेचा ठेवा आहे आणि त्यांच्या सहकार्यातून ही संस्था वाटचाल करत आहे, असेही त्यांनी नमूद केले.

संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. आजच्या दिवशी होणारा या वर्षीचा गुणगौरव समारंभ आचारसंहिता असल्याने घेता आला नाही, मात्र आचारसंहिता संपल्यावर हा कार्यक्रम घेऊन गुणीजणांचा सन्मान करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले, तर संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील यांनी आपल्या मनोगतातून संस्थेच्या पुढील काळातील धोरणाची आखणी मांडली. सोहळ्याचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव विकास देशमुख यांनी केले. त्यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली.

## रायगड मतदारसंघाची मतदान यंत्रे कडेकोट सुरक्षा व्यवस्थेत

जिल्हा क्रीडा संकुलामध्ये प्रवेश करण्याच्या प्रत्येक वाहनाची तसेच प्रत्येक व्यक्तीची मुख्य प्रवेशद्वाराजवळ तपासणी केली जाईल व केवळ अधिकृत व्यक्ती व वाहनांनाच प्रवेश दिला जाईल.

जिल्हा क्रीडा संकुलाच्या परिसरामध्ये सीसीटीव्ही बसवण्यात आले असून त्याद्वारेही परिसरात नजर ठेवली जाणार आहे. संपूर्ण बंदोबस्तामध्ये जवानांत आपसात समन्वय ठेवण्यासाठी बिनतारी संदेशवहन, दळणवळणाची सुविधा असून त्याद्वारे रायगड पोलीस दलाच्या मुख्य नियंत्रण कक्षाचे अधिकारी संपूर्ण बंदोबस्तावर लक्ष ठेवून असणार आहेत.

# वीज ग्राहकांच्या सेवेसाठी महावितरणचे ऊर्जा चॅट बॉट

**मुंबई : प्रतिनिधी**

महावितरणने राज्यातील तीन कोटी वीजग्राहकांसाठी ऑनलाइनद्वारे घरबसल्या एका क्लिकवर सर्व सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. आता कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून वीजग्राहकांच्या संवादपर मदतीसाठी ऊर्जा नावाचे चॅट बॉट २४X७ महावितरणच्या संकेतस्थळ व मोबाईल ॲपवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. इंग्रजी व मराठी भाषेतील या चॅट बॉटद्वारे महावितरणच्या विविध सेवांबाबत ग्राहकांना प्रश्न विचारता येत आहे तसेच नवीन वीजजोडणी, वीज बिल भरणा, तक्रार निवारण आदींबाबत माहिती घेण्याची सोय उपलब्ध आहे.

महावितरणच्या वीजसेवेसंदर्भात माहिती कुठे विचारावी आणि या सेवांचा घरबसल्या लाभ कसा घ्यावा हा प्रश्न आता संपुष्टात आला आहे. ग्राहकसेवांबाबत थेट प्रश्न विचारून विविध सेवांचा लाभ व तक्रारी नोंदविण्यासाठी ऊर्जा नावाचे चॅट बॉट महावितरणच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाने विकसीत केले आहे. राज्यातील घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक, कृषी व इतर ग्राहकांच्या सेवेसाठी सदैव तत्पर ऊर्जा चॅट बॉट www.mahadiscom.in ही वेबसाईट व महावितरणच्या मोबाईल ॲपवर उपलब्ध आहे. महावितरणच्या वीजसेवेबाबत माहिती हवी असल्यास ‘ऊर्जा’च्या माध्यमातून संबंधित सेवा ग्राहकांसाठी थेट ऑनलाइनद्वारे उपलब्ध होणार आहे.

यासोबतच वीजपुरवठा खंडित होणे तसेच वीजबिलांसह इतर तक्रारींबाबत संपूर्ण माहिती वीजग्राहकांना उपलब्ध होत आहे. यामध्ये तक्रार करण्यासाठी महावितरणचे २४X७ सुरू असलेले टोल फ्री क्रमांक, ‘एसएमएस’ क्रमांक, ई–मेल, मिस्ड कॉल सेवा आदींची माहिती चॅट बॉटद्वारे उपलब्ध आहे.

## दुखवटा

### ज्योती जांभळे




**पेण** : राजिपच्या माजी सदस्य ज्योती संजय जांभळे यांचे वयाच्या ४९व्या वर्षी बुधवारी (दि.८) निधन झाले. गेली काही वर्षे त्या आजारी होत्या. दोन दिवसांपूवी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथे उपचारदरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात पती, मुली, मुलगा, सून, जावई, भाऊ, बहिणी, दीर, नातवंडे असा परिवार आहे.

### दिनेश गायकवाड



**कर्जत** : नेरळ येथील पत्रकार दिनेश गायकवाड यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. निधनासमयी ते ४५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक पुत्र, एक कन्या असा परिवार आहे. सहा महिन्यांपूर्वी त्यांचे लहान भाऊ धर्मानंद गायकवाड यांचे अपघाती निधन झाले होते.

### दिनकर पाटील



**मोहोपाडा** : भाताण येथील पत्रकार सुनील दिनकर पाटील यांचे वडील दिनकर महादू पाटील यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ६७ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले,एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी १६ मे रोजी होणार असून तेरावे २० मे रोजी भाताण येथील राहत्या घरी होणार आहे.

# पनवेलमध्ये मान्सूनपूर्व कामांना वेग

## महापालिका मुख्यालयात आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पावसाळी कालावधीत आपत्ती ओढावू नये यासाठी महानगरपालिकेच्या विविध विभागात सुरू असलेल्या मान्सुन पूर्व कामांचा आढावा मुख्यालयात घेतलेल्या बैठकित प्रभारी आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांनी आढावा घेतला.

या वेळी सहाय्यक संचालक नगररचना अधिकारी ज्योती कवाडे, उपायुक्त कैलास गावडे, उपायुक्त मारुती गायकवाड, शहर अभियंता संजय जगताप, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, उपमुख्य लेखापरिक्षक संदिप खुरपे, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, सहायक आयुक्त स्वरूप खारगे, उपअभियंता विलास चव्हाण, घनकचरा व आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे, चारही विभागचे विभाग प्रमुख, वृक्ष प्राधिकरण विभाग प्रमुख संदीप पवार, पालिका अधिकारी उपस्थित होते.



महापालिकेच्यावतीने नाले सफाईची कामे युध्दपातळीवर सुरू आहेत. आत्तापर्यंत झालेल्या नालेसफाईच्या कामाचा आढावा घेऊन उर्वरित कामे लवकरात लवकर संपवण्याबाबत या वेळी आयुक्तांनी संबधित विभागास सूचना दिल्या तसेच पाणी साठत असलेल्या ठिकाणांची माहिती घेऊन त्या ठिकाणी पावसाळ्यामध्ये पंप लावण्याबाबत आयुक्तांनी सूचना दिल्या. धोकादायक झाडे तोडणे, धोकादायक फांद्या तोडण्याचे काम विद्युत विभागासोबत समन्वय साधून काम करण्याबाबत आयुक्तांनी सांगितले. काम झाल्यानंतर फांद्या ताबडतोब उचलण्याबाबत आयुक्तांनी सूचित केले.

वैद्यकिय आरोग्य विभागाला पावसाळ्यापूर्वी आवश्यक औषधांचा साठा करण्याचा सूचना आयुक्तांनी संबधित विभागास दिल्या. याबरोबर रस्ते दुरूस्तीची कामे व रस्ते बांधणीची कामे पावसाळ्यापूर्वी संपवावी, असे निर्देश आयुक्तांनी बांधकाम विभागास दिले.

पावसाळ्यापूर्वी धोकादायक इमारतींवर कारवाई करण्याबाबत प्रभारी आयुक्तांनी सूचना दिल्या. याकामी चारही प्रभागातील प्रभाग अधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन या इमारती पावासाळ्यापूर्वी रिकाम्या करून घ्याव्यात असे आयुक्तांनी सांगितले. ही सर्व कामे २५ मे पूर्वी करण्याबाबत आयुक्तांनी सर्व विभागास सूचित केले.

## मोटरसायकल अपघातात दोघांचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

जेएनपीटी ते पुणे जाणाऱ्या रोडवर पळस्पे फाटा ब्रिजवर भरधाव मोटरसायकलची ब्रिजच्या कठड्याला धडक बसून झालेल्या अपघातात मोटरसायकलीवरील दोन तरुणांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

इमरान पठाण (रा.कोळखे पेठ) हा त्याच्या ताब्यातील पल्सर मोटरसायकल (एमएच ०६ बीवाय ८५१८) हिने जेएनपीटी ते पुणे जाणाऱ्या रोडवर पळस्पे फाटा ब्रिजवर जात होता. या वेळी वाहनावरील नियंत्रण सुटल्याने त्याची ब्रिजच्या कठड्याला धडक जोरात धडक बसली. या अपघातात तो स्वतः गंभीररीत्या जखमी होऊन मयत झाला आहे. त्याचप्रमाणे त्याच्या मागे बसलेला विघ्नेश भालेराव याचासुद्धा या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या अपघाताची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## पनवेलच्या शिक्षिकेला लाखोंचा गंडा

**पनवेल : वार्ताहर**

फेसबुक या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अनोळखी व्यक्तीशी मैत्री करणे पनवेलमधील एका शिक्षिकेला महागात पडले. या भामट्याने आधी शिक्षिकेशी मैत्री करून तिला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात अडकवून तिची ३० लाख ९६ हजार ८६५ रुपयांची फसवणूक केली.

पोलीस ठाण्यामध्ये दाखल केलेल्या तक्रारीनुसार मार्च २०२४ मध्ये डॉक्टर फेलेसिया प्रिन्स नावाच्या व्यक्तीने महिला शिक्षिकेला फेसबुकवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली होती, जी तिने स्वीकारली. यानंतर भामट्याने गिफ्ट पाठवण्यास सांगितले. काही दिवसांनी दुसऱ्या महिलेने कस्टम अधिकारी असल्याचे भासवून फोन केला आणि तुमच्या नावावर पार्सल आले आहे, असे विविध शुल्क सांगून एकूण ३० लाख ९६ हजार ८६५ रुपये वेगवेगळ्या खात्यात ट्रान्सफर केले. पैशाची मागणी सुरूच राहिल्याने शिक्षिकेला आपली फसवणूक झाल्याचे समोर आले.

## जय गोपीनाथ प्रतिष्ठानचा खासदार बारणेंना पाठिंबा

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

मावळचे संसदरत्न खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांना जय गोपीनाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेने बुधवारी (दि. ८) कळंबोली मध्ये जाहीर पाठिंब्यांचे पत्र दिले.

विविध सामाजिक क्षेत्रात काम करणारी संस्था म्हणून जय गोपीनाथ प्रतिष्ठान ही नावाजलेली संस्था आहे. या संस्थेचे राज्यभर जाळे पसरलेले आहे. या संस्थेचे बहुतांश पदाधिकारी पनवेल, पिंपरी चिंचवड या भागात राहतात त्यामुळे या भागाचा विकास जो खासदार करू शकतो असा त्यांना विश्वास आहे अशा श्रीरंग आप्पा बारणे यांना संस्थेचे अध्यक्ष सुभाष आंधळे, सल्लागार बबन बारगजे, सचिव हनुमंत विघ्ने, खजिनदार संग्राम केंद्रे रायगड जिल्हा अध्यक्ष किरण गीते रायगड जिल्हा सचिव घोळवे व इतर पदाधिकारी यांनी सर्व पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांना जाहीर पाठिंबा दिला.

आमदार प्रशांत ठाकूर व शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांच्या उपस्थितीत संस्थेचे सल्लागार बबनराव बारगजे सचिव हनुमंत विघ्ने रायगड जिल्हा सचिव विठ्ठल घोळवे, कार्यालयीन सचिव विठ्ठल गुट्टे व सदस्य हरिभाऊ दहिफळे हे उपस्थित होते.



# महायुतीचे उमेदवार खासदार बारणेंच्या प्रचारार्थ खारघरपासून ते कळंबोलीपर्यंत भव्य रोड शो

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी खारघरपासून ते कळंबोलीपर्यंत भव्य रोड शोचे आयोजन बुधवारी (दि. ८) करण्यात आले होते. पनवेल विधानसभा मतदार संघात श्रीरंग बारणेच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे या रोड शोला तरुणांसह महिला आणि मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. येत्या १३ तारखेला मतदान असल्याने प्रचाराचा अंतीम टप्प्यातील प्रचाराला वेग आला आहे. त्या अनुषंगाने खारघरमध्ये भव्य रोड शोचे आयोजन महायुतीच्या वतीने करण्यात आले होते.



या रोड शोमध्ये विजयरथावर खासदार श्रीरंग बारणे, आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, शिवसेनचे जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे उपस्थित होते. या रोड शो मध्ये अनेक तरुण भव्य बाईक काढून सहाभागी झाले होते. प्रत्येक ठिकाणी श्रीरंग बारणे यांचा मतदारांनी फुलांनी उधळन करत तसेच ठिकठिकाणी क्रेनच्या सहाय्याने भव्य हार त्यांगळ्यात घालून त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. हा रोड शोला खारघरपासून सुरुवात झाली असून संपुर्ण कळंबोली परीसरात काढण्यात आला. या वेळीही मतदारांनी त्याच जल्लेषात स्वागत करण्यात आले. या रोड शोची सांगता कळंबोलीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेच्या ठिकाणी झाली. या रोडशो दरम्याना महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी करत मावळ मतदार संघातून श्रीरंग बारणे यांच्या विजयाची हॅट्रीक करून त्यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

या वेळी भाजपचे प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, शिवसेना जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे, कळंबोली शहर अध्यक्ष रवीनाथ पाटील, भाजपचे खारघर शहर अध्यक्ष प्रवीण पाटील, पनवेल महपालिकेचे माजी स्थायी सभापती अमर पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, अभीमन्यु पाटील, निलेश बाविस्कर, शत्रृघ्न काकडे, माजी नगरसेविका प्रमिला पाटील, माजी नगरसेविका आरती नवघरे, नेत्रा पाटील, संजना कदम, भाजपचे खारघर शहर सरचिटणीस दीपक शिंदे, राष्ट्रवादीचे पनवेल जिल्हा अध्यक्ष महादेव पाटील, शिवसेना तालुका प्रमुख परेश पाटील, तालुका संपर्क प्रमुख रुपेश ठोंबरे, मनसेचे राहुल चव्हाण, विवेक बोराडे, राष्ट्रवादीचे सचिन कुंभार, भाजपच्या महिला मोर्चाच्या प्रिया मुकादम, कुंदा गोळे, विजय पाटील, गीता चौधरी, महिला मोर्चाच्या साधना पवार, किरण पाटील, संतोष शर्मा, परेश पाटील, युवा मोर्चाचे दिनेश खानावकर, अमर ठाकूर यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## ट्रेडिंगचे आमिष दाखवून लाखो रुपयांची फसवणूक

### दोघांवर गुन्हा

**पनवेल : वार्ताहर**

ट्रेडिंग केली तर त्याचा चांगला फायदा होईल असे सांगून २१ लाख ८३ हजार रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दोन जणांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मच्छिंद्रनाथ मुरलीधर गोरे हे बालाजी सिम्फनी, सुकापुर येथे राहतात. ते फेसबुक पाहत असताना शेअर मार्केट लीडर ९२ हे पेज त्यांनी क्लिक केले. त्यावेळी त्यांनी त्यांची माहिती सबमिट केली. त्यावेळी व्हॉट्सअॅप ग्रुपची रिक्वेस्ट आली. ती त्यांनी स्वीकारली. त्यानंतर त्यांना ट्रेडिंग संदर्भात माहिती देण्यात आली व ग्रुप मधील सदस्यांचे रात्री ऑनलाईन लेक्चर घेऊन त्यामध्ये शेअर मार्केटची माहिती दिली. सुनील सिंघानी आणि करणवीर धिलोन असे नाव सांगणाऱ्या व्यक्तीने फेसबुक आणि व्हॉट्सअॅपद्वारे संपर्क साधून त्यांच्या एएलआयसीई कंपनीमध्ये ट्रेडिंग केली तर त्याचा चांगला फायदा होऊन असे सांगितले.

यासोबतच पुढे त्यांनी सांगितले की, गुंतवणुकीच्या प्रॉफिटची रक्कम ८७ लाख रुपये मिळण्याकरता त्यांनी ९.५६ लाख रुपये टॅक्स भरले नाही तर तुमच्या खात्यामध्ये प्रॉफिटची रक्कम जमा होणार नाही असे सांगून टप्प्याटप्प्याने वेगवेगळ्या खात्यावर २१ लाख ८३ हजार रुपये ट्रान्सफर करण्यास सांगितले आणि ती रक्कम परत न करता फसवणूक केली.

## गव्हाण विद्यालयात कर्मवीर पुण्यतिथीनिमित्त अभिवादन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्रातील गरीब,दीन दुबळ्या दलित बहुजन समाजाला शिक्षित करण्यासाठी अवघे आयुष्य समर्पित करणारे महान कर्मयोगी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक थोर शिक्षण महर्षी पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.

पद्मभूषण डॉ.कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस विद्यालयाचे क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

या वेळी विद्यालयात ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख बाबबुलाल पाटोळे, ज्येष्ठ शिक्षक एकनाथ ठाकूर, सागर रंधवे, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, राजेंद्र चौधरी, माणिक घरत, प्रशांत परदेशी, लेखनिक चंद्रकांत मढवी, ग्रंथपाल महेश म्हात्रे, कला शिक्षक गणेश भोईर, ज्येष्ठ शिक्षिका चित्रलेखा पाटील, चारुशीला ठाकूर, जयवंती ठाकूर, प्रणाली पाटील, अर्चना पाटील, द्रौपदी वर्तक, सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील, उर्मिला गोंधळी, प्रमोद करावकर तसेच जनार्दन खैरे व दयानंद खारकर आदी रयत सेवक उपस्थित होते.



**उरण : कसळखंड ग्रुप ग्रामपंचायतीचे सदस्य सुरेश नाईक यांनी ठाकरे गटातून भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांचे आमदार महेश बालदी यांनी पक्षात स्वागत केले. या वेळी दोनच दिवसांपूर्वी भाजपमध्ये प्रवेश केलेले कसळखंडचे माजी सरपंच अनंता पाटील, सदस्य प्रफुल मते, रमेश पाटील, हेमंत पाटील, भूषण पाटील, योगेश पाटील, प्रसाद पाटील, घनश्याम पाटील, बुथ अध्यक्ष दत्ता गायकर आदी उपस्थित होते.**

## उंचीरोधकासाठी भाजपचा पाठपुरावा

**उरण : बातमीदार**

उंचीरोधकामुळे उरण-पनवेल या मुख्य मार्गावरील एसटीची प्रवासी बससेवा मागील तीन वर्षांपासून बंद आहे. या उंचीरोधकामुळे प्रवाशांना वेगवेगळ्या समस्यांना तोंड द्यावे लागत होते. आता मात्र ही समस्या आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनासाठी जिल्हा परिषद सदस्य विजय भोईर यांनी केलेल्या प्रयत्ना मुळे सुटली आहे.

उंचीरोधक सोमवारी रात्री अखेर हटविण्यात आले आहेत. त्यामुळे बोकडविरा, फुंडे, डोंगरी आणि पाणजे येथील हजारो नागरिकांना दिलासा मिळाला आहे. याबद्दल आनंदही व्यक्त केला जात आहे, मात्र हे उंचीरोधक हटविण्यात आल्याने मार्गावरील एसटी बससेवा पूर्ववत करण्याची मागणी येथील नागरिकांनी केली आहे.

प्रवास सुलभ, सुरक्षित होणार असल्यामुळे प्रवाश्यांनी आमदार महेश बालदी, माजी जि. प. सदस्य विजय भोईर यांचे आभार मानले आहेत.








**पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील यांनी वलप, पाले बुद्रुक, वळवली, टेंभोडे, नेवाळी, आदई, केवाळे, हरिग्राम, चिपळे आदी ठिकाणी पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह प्रचार केला. शिवसेना तालुकाप्रमुख रूपेश ठोंबरे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.**

## संपादकीय

# काँग्रेसची पाचावर धारण!

सार्वत्रिक निवडणुकीतील प्रचाराचे गेले दोन्ही दिवस काँग्रेस आणि तथाकथित 'इंडिया आघाडी'साठी वाईट गेले असतील. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रचारसभांतील जबरदस्त हल्ल्यांमुळे काँग्रेस नेत्यांची पळता भुई थोडी झाली आहे. दुसरीकडे काँग्रेस पक्षातीलच नेते सॅम पित्रोडा यांचा बोलभांडपणा काँग्रेसपक्षासाठी पुन्हा एकदा अडचणीत आणणारा ठरला आहे.

**काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांचे सल्लागार आणि काँग्रेस पक्षाची विदेशातील शाखा सांभाळणारे सॅम पित्रोडा यांनी पुन्हा एकदा आपल्या बुद्धीचे तारे तोडून भाजपच्या हातात आयते कोलीत दिले. भारतात अनेक वंशांचे लोक राहतात. 'पूर्वेकडील लोक चिनी ठेवणीचे, पश्चिमेकडले अरबी तोंडवळ्याचे, उत्तरेकडले गोरेगोरे आणि दक्षिणेकडले आफ्रिकी चणीचे आणि वर्णाचे असतात' असा जावईशोध त्यांनी लावला. कम्प्युटर आणि आधुनिक तंत्रज्ञानात विशेष तज्ज्ञता असल्याचे सॅम पित्रोडा नेहमीच मिरवतात. दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या राजवटीत ते तंत्रज्ञान सल्लागारही होते. पण त्यांना अनेक विषयांत गती आहे असे दिसते. गेल्या निवडणुकीच्या वेळी दिल्लीतील शीखविरोधी दंगलींच्या संदर्भात 'हुआ सो हुआ' असे अत्यंत असंवेदनशील उद्गार काढून त्यांनी खळबळ माजवली होती. तेव्हाही काँग्रेसला दिलगिरी व्यक्त करावी लागली होती. काही दिवसांपूर्वी त्यांनी वारसाहक्काचा मुद्दा विनाकारण उकरून काढत अमेरिकी कायद्याचे दाखले दिले होते. तेव्हाही टीकेची अशीच राळ उठली होती. पित्रोडा यांचे ते वैयक्तिक मत आहे, त्याचा काँग्रेसच्या धोरणाशी काहीही संबंध नाही, असे स्पष्ट करून त्या पक्षाला हात झटकावे लागले होते. बुधवारी याच पित्रोडा यांनी पुन्हा आपल्या वक्तव्याने नवाच वाद ओढवून घेतला. निवडणुकीच्या काळात असला रंग-वर्णभेदाचा मुद्दा काढून त्यांनी नेमके काय मिळवले हा संशोधनाचा मुद्दा ठरावा. त्यामुळे काँग्रेसची मात्र प्रचंड कोंडी झाली. अखेर पुन्हा एकदा वैयक्तिक मताच्या खांबाआड लपत त्यांनी काँग्रेसच्या विदेशी शाखेच्या प्रमुख पदाचा राजीनामा देत असल्याचे जाहीर केले. काँग्रेस भारतातच जेमतेम उरली आहे. तिचे विदेशात अस्तित्व ते काय असणार? तरीही या ओसाडगावच्या पाटीलकीचा राजीनामा दिल्याचे जाहीर करून पित्रोडा यांनी हात झटकले आहेत. भाजप आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या नेत्यांनी पित्रोडा यांच्या बेजबाबदार वक्तव्याचा खरपूस समाचार घेतला हे वेगळे सांगायची गरज नाही. पित्रोडा यांच्यामुळे झालेल्या कोंडीतून धड बाहेर येण्याआधीच काँग्रेस पक्षावर खुद्द पंतप्रधान मोदी यांनी अनपेक्षित तोफगोळा टाकला. 'गेली पाच वर्षे 'अदानी-अंबानी' अशी जपमाळ ओढणाऱ्या राहुल गांधी यांनी अचानक ही नावे घेणे बंद का केले? त्यांना टेम्पोद्वारे काळा पैसा पोचला का? काही सौदा पटवला का?' असा थेट आरोप पंतप्रधानांनी केला. त्यामुळे काँग्रेस नेतृत्व इतके सटपटले की राहुल गांधी यांनी लगोलग व्हिडिओ संदेश प्रसारित करून त्यांच्या पद्धतीने काहीतरी उत्तर दिले. सतत आरोप करणाऱ्या गांधी यांना आता बऱ्याच सवालांना तोंड द्यायची तयारी ठेवावी लागणार आहे. कारण पंतप्रधानांनी केलेला सवाल आता जनताही करू लागेल यात शंका नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासारख्या ज्येष्ठ व्यक्तीबद्दल अपमानास्पद शेरेबाजी करून अथवा वेडेवाकडे आरोप करून पळ काढणे सोपे असते, पण ते सिद्ध करणे अवघड, याची चुणूक त्यांना मिळाली असेल. निवडणुकीचे पुढले टप्पे त्यांच्यासाठी अधिकाधिक कटकटीचे होत जातील एवढे मात्र नक्की.**

# बच्चेकंपनीला ऑनलाईन गेम, मोबाईलचे व्यसन



उन्हाच्या सुट्ट्या लागल्या की सर्वत्र लगबग दिसून यायची, मात्र सध्या उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागूनही सन्नाटाच दिसून येत आहे. मामाचे पत्र हरविले ते आम्हाला नाही सापडले लपंडाव गोट्या, भोवारा, विटी दांडू, कबड्डी, खो-खो, आट्यापाट्या, क्रिकेट, असे विविध खेळ जणू सध्याच्या मुलांना माहितीच नाही अशी परिस्थिती निर्माण झाली असून मुलांचा कल ऑनलाईन खेळाकडे वळत असल्याचे दिसून येत आहे.

बदलत्या काळानुसार पारंपारिक खेळदेखील लोप पावत चाललेले पाहायला मिळत आहे. सध्याच्या एकविसाव्या शतकामध्ये मुलांना पारंपारिक खेळ जणू काही माहितीच नाही असे दृश्यच निर्माण झाले आहे. प्रत्येक मुलाच्या हातात स्मार्ट मोबाइल दिसत असल्यामुळे सध्याच्या मुलांचा कल हा ऑनलाइन गेम खेळण्याकडे जास्त दिसत आहे.

पूर्वी सुट्टी लागताच लहान मुले एकत्र जमून विविध खेळ खेळत. त्या खेळांचा गोंगाट कानावर पडायचा, मात्र सध्या तसे नसून सर्वत्र शांतता पसरलेली दिसून येत आहे. विज्ञान जसजशी क्रांती घडवत गेलं तसतसा माणसांमध्येसुद्धा बदल होत गेला आणि सध्या शहरी भागामध्ये उन्हाळा शिबिर चालवण्याची पद्धत उदयास आली आहे. उन्हाळा शिबिर हे लहान मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी नसून पैसे कमविण्याचे एक नवीनच फॅड निर्माण झाले आहे. पूर्वी मैदानी खेळ खेळून शरीर सुदृढ धष्टपुष्ट बनायचे. मात्र सध्या ऑनलाइन गेम ने मुले कमकुवत बनत चाललेली आहेत

मुलांना मोबाईल कॉम्प्युटरवरील गेमची इतकी आवड निर्माण झाली आहे की, त्यांना एक प्रकारचे व्यसन लागलेली आहे. जर ऑनलाईन गेम उपलब्ध करून दिला नाही तर मुलांमध्ये चिडचिडेपणा वाढू लागला आहे. अनेक मुलं तर मोबाईल शिवाय जेवतदेखील नाहीत अशी भयानक परिस्थिती सध्याच्या काळात निर्माण झाली आहे.

उन्हाळ्याची सुट्टी ही मामाच्या गावाला जायचं विविध खेळ खेळायचे यासाठी असून सध्याची मुलं उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये घरातच बसून राहिल्यामुळे मुलांचा जो व्यायाम या वयात व्हायला हवा तसा होत नसल्यामुळे मुलांना लहान वयातच आरोग्याच्या विविध समस्या जाणवतात. तासनतास कॉम्प्युटर समोर बसल्यामुळे लहानपणीच मुलांना चष्मे लागत आहे. शरीराची पुरेसी वाढ न होणे भूक न लागणे, चिडचिडेपणा अशा आरोग्याच्या विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. लपंडाव, खो-खो, कबड्डी, क्रिकेट, आट्यापाट्या अशा विविध खेळांमुळे मुलांचा शारीरिक व्यायाम होत होता. यामुळे मुलांचे आरोग्य देखील सुदृढ राहत होते, परंतु घरातच बसून मैदानी खेळ न खेळल्यामुळे आज मुलांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मुख्य म्हणजे पालक आपल्या मुलांना घरातच बसून ठेवतात यामुळे त्यांच्या शरीराचा सर्वांगीण विकास होत नाही. खो-खो, कबड्डी आणि आट्यापाट्या या खेळांमुळे मुलांचा व्यायाम होतो व शरीर सदृढ बनते याचा पालकांनी विचार करायला हवा मात्र सध्याचे पालक हे मुलांच्या हातात मोबाईल देताना दिसून येत आहे.

शहरी भागामध्ये तर मैदानी खेळ खेळण्यासाठी मैदाने कमी पडायला लागली आहेत. त्यात फ्लॅट संस्कृती सगळी कडे रुजत आहे. खेळण्यासाठी मैदान आता राखून ठेवावी लागत आहेत. त्यातही मुलांना खेळण्यासाठी तासाला पैसे मोजावे लागतात. खेळण्यामध्येसुद्धा लोकांनी पैसा आणि धंदा शोधून काढला आहे. आपल्या मुलांनी बाहेर कुठे खेळायला जाऊ नये आणि घरातच बसून काय ते खेळावे म्हणून त्याला घरात खेळता येतील असे खेळ आणून दिले जातात. या मागे हेतू दोन तीन असतात. एक तर आई-वडील दोघेही कामाला जात असतात. त्यामुळे बाहेर कुठे भटकण्यापेक्षा मुल घरीच सुखरूप राहिलेली चांगली, त्यासाठी त्याला हवे ते घरीच आणून दिले जाते आणि मुलांचे नको ते हट्ट देखील पुरविले जातात. दुसरं म्हणजे काळजी, ती पण अति काळजी. मुल बाहेर खेळायला गेले तर त्याला लागेल, मातीत हात खराब होतील अशी भलतीच काळजी. त्यातूनही एखादा पालक जर मातीत खेळायला सोडत असेल तर त्याला ढीगभर नियम, चपलाच घालून जा, जास्त वेळ मातीत खेळू नकोस, आल्यावर हात-पाय साबणाने धुवा. अशी नियमांची सरबत्तीच त्यांच्यापुढे चालूच राहते. मुलं विचार करत असतील कि इतके नियम पाळण्यपेक्षा मातीत न खेळलेल बर.



हल्ली जिथे बांधकाम चालू असेल तिथे काम करणाऱ्या लोकांचीच मुले तेवढी मातीत खेळताना दिसतात.सर्वसामान्यांची मुले सोडली तर अफाट पैसेवाले पालक मुलांना कोणत्या तरी शिकवणी मध्ये सारखीच गुंतवून ठेवतात. कोणी कराटेच्या, कोणी नाचण्याच्या, कोणी चित्रकलेच्या, कोणी तबल्याच्या.. प्रत्येकाची वेगळी पध्द्त जगाच्या वेगळीच पाहायला मिळते. प्रत्येकाच्या पालकांना वाटत आपल्या मुलाने शिकून खूप मोठं व्हावं मग त्यासाठी कसून मेहनत करून घेण्याच्या नादात आपली संस्कृती, परंपरा, मैदानी खेळ लोप पावत चालले आहेत हे त्यांच्या लक्षातच येत नाही.

पारंपरिक खेळ एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जातात. मात्र शहरी भागासारख्या अन्य ठिकाणी उन्हाळा शिबिर राबवून उरलेले सुरलेले खेळ तरी तग धरून राहतील का? काही वर्षांपूर्वी मैदानी खेळ खेळण्यासाठी पालक आपल्या मुलांना प्रोत्साहन द्यायचे मात्र गेल्या काही वर्षापासून मैदानी खेळ मुले विसरत चाललेली पाहायला मिळत आहे. ऑनलाईन गेम्स खेळणाऱ्या मुलांचे प्रमाण वाढले आहे. प्रतिदिन एक ते दोन पालक आपल्या मुलांना घेऊन समुपदेशनासाठी येत असल्याचे मानसोपचार तज्ञ डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान ६० टक्क्यांपेक्षा जास्त मुले ऑनलाईन मोबाईल पीसी गेम्स कडे आकर्षित झाली असल्याचे दिसत आहे.

उन्हाळ्याच्या सुट्यांमध्ये आई-वडील उन्हामुळे बाहेर निघू देत नाहीत. घरातच बसून कॅरम, बुद्धिबळ असे खेळ खेळायला लावतात. शाळा सुरू झाल्यावर अभ्यासामुळे काही खेळताच येत नाही. शाळा, ट्युशन, घरी आल्यावर अभ्यास यामध्ये स्वतःलाच वेळ मिळत नाही तर खेळायचे कधी, असे विद्यार्थीनी ऋतुजा कान हिने सांगितले.

उन्हाळी शिबिरे चालविली जातात, त्यांचा उद्देश मुलांना खेळ खेळवण्याचा नाही, तर फक्त पैसे कमवण्याचा आहे. पालकांनी आपल्या पाल्यांना पारंपरिक खेळ खेळायला प्रवृत्त करायला हवे, असे शिक्षक सगरनाथ भंडारी म्हणाले.

नोकरी करत असल्यामुळे मुलांवर जास्त लक्ष देता येत नाही, मोबाईलमुळे मुलं ऐकतात,एका जागेवर बसतात, नाईलाजाने मोबाईल द्यावा लागतो, असे पालक संगीता बोरचटे यांचे म्हणणे आहे. **-अशोक शेशवरे**



## बदलते तंत्रज्ञान

# गुगल वॉलेटची भारतात एंट्री! 'गुगल पे'पेक्षा असेल वेगळे

सध्या अँड्रॉईड युजर्सना गुगल वॉलेट वापरता येणार आहे.गुगलने भारतात वॉलेट लाँच केले आहे. गुगल वॉलेट प्ले स्टोअर वरून डाउनलोड करता येते. वापरकर्ते Google Wallet मध्ये डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, लॉयल्टी कार्ड आणि गिफ्ट कार्ड वापरु करू शकतात. गुगलने अँड्रॉइड वापरकर्त्यांसाठी डिजिटल वॉलेट उपलब्ध करून दिले आहे.




कंपनीने सांगितले की, अँड्रॉइड वापरकर्ते त्यांचे कार्ड, चित्रपटाची तिकिटे, बोर्डिंग पास, की आणि आयडी गुगल वॉलेटद्वारे सुरक्षितपणे साठवू शकतात. हे Google Pay ॲपपेक्षा पूर्णपणे वेगळे असेल.

Google Pay पैसे आणि वित्त व्यवस्थापित करण्यासाठी वापरले जाते. गुगलच्या अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती अशी, गुगल पे बंद होणार नाही. हे आमचे प्राथमिक प राहील. आम्ही नॉन-पेमेंट हेतूंसाठी Google Wallet तयार केले आहे.

लोकांची डिजिटल कागदपत्रे एकाच ठिकाणी सुरक्षित ठेवण्यासाठी गुगल वॉलेट उपयुक्त ठरेल. वॉलेटमुळे तुमची दैनंदिन कामे सुलभ होतील, असा गुगलचा दावा आहे.


गुगल वॉलेटने भारतातील २० मोठ्या ब्रँडशी करार केला आहे. यामध्ये पीव्हीआर आयनॉक्स, एअर इंडिया, इंडिगो, फ्लिपकार्ट, पाइन लॅब्स, कोची मेट्रो आणि अभिबस यांचा समावेश आहे. याच कारणामुळे गुगल वॉलेटच्या मदतीने तुम्हाला चित्रपट किंवा कार्यक्रम पाहणे, प्रवास करणे, लॉयल्टी आणि गिफ्ट कार्ड वापरणे, सार्वजनिक वाहतूक वापरणे आणि तुमचे महत्त्वाचे दस्तऐवज वापरणे यामध्ये मदत होईल.

Google Pay पूर्वी Android Pay म्हणून ओळखले जात होते. हे Google ने मोबाईल पेमेंट सेवा म्हणून विकसित केले आहे. Google Pay च्या मदतीने तुम्ही कोणत्याही मोबाईल फोन, टॅबलेट किंवा घड्याळावरून पेमेंट करू शकता.

वापरकर्ते पिन, पासकोड किंवा बायोमेट्रिक्सच्या मदतीने सुरक्षित पेमेंट करू शकतात. Google Pay सध्या भारतासह ७९ देशांमध्ये उपलब्ध आहे.

# ख्यातनाम गीतकार जगदीश खेबुडकर

कोल्हापुरात १० मे १९३२ रोजी जन्मलेले जगदीश खेबूडकर हे अत्यंत लोकप्रिय मराठी गीतकार म्हणून ओळखले जातात. गांधीजींच्या खुनानंतर त्यांच घर जाळलं गेलं, तेव्हा त्या राखेच्या ढिगाऱ्याकडे पाहून त्यांनी 'मानवते तू विधवा झालीस' हे काव्य रचून आपल्या प्रतिभेची चुणूक किशोर वयात दाखवून दिली होती. चित्रपटगीते या प्रकारात हातखंडा असणाऱ्या खेबूडकरांनी पोवाडा, अभंग, ओवी अशा सर्वच प्रकारात आपली प्रतिभा सिद्ध केली होती.



**निमित्त**

धुंद आज डोळे, धुंद एकांत हा, धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना, धुंदीत गाऊ मस्तीत राहू, नाच गं घुमा कशी मी नाचू, कंबर लचकली, निसर्गराजा ऐक सांगते, निळे गगन निळी धरा, पिकल्या पानाचा देठ, प्रभू सोमनाथा, प्रेमाला उपमा नाही, बाई बाई मन मोराचा, बिब्बं घ्या बिब्बं शिक्ककाई, ब्रह्मा विष्णू आणि महेश्वर, मला इष्काचि इंगळी डसली, मला लागली कुणाची उचकी, मला हे दत्तगुरू दिसले, मला हो म्हनत्यात लवंगी मिरची, मी आज फूल झाले, मी जलवंती मी फुलवंती, या रावजी बसा भावजी, राजा ललकारी अशी रे, रुणझुणत्या पाखरा, वारा गाई गाणे, विठू माऊली तू माऊली जगाची, शुभंकरोति म्हणा मुलांनो, सख्या रे घायाळ मी हरिणी, सत्यम शिवम सुंदरा, स्वप्नांत रंगले मी, स्वप्नात साजणा येशील का, हलके हलके जोजवा, हवास मज तू हवास तू, हिरवा निसर्ग हा भवतीने, ही कशानं धुंदी आली, अगं नाच नाच राधे, अरे मनमोहना, आकाशी झेप घे रे पाखरा, आज प्रीतिला पंख हे लाभले रे, आली ठुमकत नार लचकत, एक लाजरा न् साजरा, एकतारीसंगे एकरूप झालो, ऐरणीच्या देवा तुला ठिणगी ठिणगी वाहू दे, कशी नशिबानं थट्टा आज मांडली, कसं काय पाटील बरं हाय का?, किती सांगू मी सांगू कुणाला, कुठं कुठं जायचं हनिमूनला, कुण्या गावाचं आलं पाखरू, कोण होतीस तू काय झालीस तू, चंद्र आहे साक्षिला, छबीदार छबी मी तोऱ्यात उभी, तुम्हांवर केली मी मर्जी, दाम करी काम येड्या, दिसला गं बाई दिसला, दे रे कान्हा चोळी अन् लुगडी, देहाची तिजोरी भक्तीचाच ठेवा, अशी त्यांची कित्येक गाणी आजही लोकांच्या ओठांवर असतात.

अंदाजे ४०० चित्रपटासाठी गीतांचे सर्व प्रकार जगदीश खेबुडकरांनी हाताळले. बालगीतापासून प्रेमगीते, नांदी, पोवाडा, भक्तीगीते, अंगाई गीते, कीर्तन, वासुदेव, कोळीगीत, गण, गौळण, वग, हादग्याची गाणी, भजन असे अनेक प्रकार हाताळले. सर्व थरांतल्या, सर्व वयोगटांसाठी अविस्मरणीय अशी गीतरचना सातत्याने त्यांच्याकडून होत आली

खेबुडकर यांना महाराष्ट्र राज्य शासन पुरस्कार, गदिमा पुरस्कार, फाय फाउंडेशन पुरस्कार, व्ही. शांताराम पुरस्कार, शाहू पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार, कुसुमाग्रज पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलं आहे. ३ मे २०११ रोजी त्यांचं कोल्हापूरमध्ये निधन झालं. (साभार : बाईट्स ऑफ इंडिया)


**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : राजपुरी खाडीत कोळी बांधवांच्या बोटी मासेमारीचा अखेरीचा हंगाम करण्यासाठी सज्ज झाल्या आहेत. सकाळपासूनच खोल समुद्रात जाण्याची त्यांची तयारी सुरू होती.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# उन्हाळ्यात अशी घ्या डोळ्यांची काळजी...



वाढत्या तापमानामुळे डोळ्यांशी संबंधित जंतुसंसर्ग वाढत आहे. उन्हाळा सुरू झाला आहे. या वातावरणामध्ये तुम्हाला उन्हापासून सुटका मिळविण्यासाठी तुम्ही काही ना काही पर्याय शोधत असता, पण आपल्या शरीराच्या सर्वांत महत्त्वाच्या भागाची काळजी घेण्यास विसरतो, ते म्हणजे डोळे. डोळ्यांच्या समस्या टाळण्यास मदत करण्यासाठी येथे काही सोप्या पायऱ्या आहेत...

१. अल्ट्राव्हायोलेट संरक्षणासह सनग्लासेस डोळ्यांना कोणत्याही प्रकारच्या नुकसानीपासून वाचवण्यास मदत करतात आणि कोणत्याही प्रकारच्या सूर्यप्रकाशास देखील कमी करतात.

२. कमीत कमी ७ ते ९ तास झोपा कारण ते तुमच्या डोळ्यांना नैसर्गिक पद्धतीने टवटवीत करण्यास मदत करते.

३. तुमचे डोळे सुजलेले किंवा लाल असल्यास, लक्षणे दूर करण्यात मदत करण्यासाठी त्यांना दिवसातून काही वेळा थंड पाण्याने धुण्याचा प्रयत्न करा.

४. तुमचे डोळे निरोगी ठेवण्यासाठी आणि अति सूर्यप्रकाशाच्या हल्ल्यापासून बरे होण्यासाठी हिरव्या पालेभाज्या, फळे, गाजर, यकृत, कॉड लिव्हर, नट इत्यादींचा तुमच्या रोजच्या आहारात समावेश करा.

५. पुरेशा प्रमाणात पाणी पिऊन उन्हाळ्यात चांगले हायड्रेटेड राहा, आणि निरोगी आहारा आणि फळांचा रस घेतल्ल्याने कोरडे डोळे टाळता येतात आणि उन्हाळ्यात तुम्हाला चांगले हायड्रेट ठेवता येते.

६. कृत्रिम अश्रू किंवा कोणत्याही प्रकारचे पर्याय जसे की आय ड्रॉप डोळ्यातील नैसर्गिक ओलावा पुनर्संचयित करण्यात मदत करू शकतात. उन्हाळ्यात त्यांचा वापर हा हायड्रेटेड राहण्याचा एक उत्तम मार्ग आहे, केवळ कोरडेपणा टाळण्यासाठीच नाही तर कोणत्याही प्रकारच्या संसर्गापासून बचाव करण्यासाठीदेखील, पण डॉक्टरांच्या सल्ल्यानेच हे आय ड्रॉप वापरा.


७. तुमच्या डोळ्यांना आराम देण्यासाठी, डोळे बंद करून काकडीचा तुकडा थोडावेळ धरून ठेवा.

# रायगडातील २८ धरणांत ३२.४२ टक्के पाणीसाठा

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात वाढत्या उष्णतेमुळे दिवसेंदिवस धरणातील पाणीसाठा कमी होताना दिसत आहे. जिल्ह्यातील २८ धरणात ३२.४२ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

रायगड जिल्ह्यात सर्वात कमी तीन धरण क्षेत्रात १० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. यामध्ये जिल्ह्यात सर्वांत कमी पाणीसाठा फणसाड सहा टक्के, श्रीगांव सहा टक्के व कोथुर्डे धरणात आठ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे, तर सर्वांत जास्त पाणीसाठा पेण तालुक्यातील आंबेघर धरणात ७१ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. दिवसेंदिवस उष्णतेमुळे पाणीसाठा जिल्ह्यातील कमी होताना दिसत आहे. त्यामुळे पाण्याची बचत करणे आवश्यक आहे. अद्याप पावसाळा सुरू होण्यासाठी एका महिन्यापेक्षा जास्त कालावधी शिल्लक आहे.



२८ धरणांतील पाणीसाठा पाहता, यामध्ये प्रामुख्याने तळा तालुक्यातील वावा धरणात ४६ टक्के, रोहा तालुक्यातील सुतारवाडी धरणात ३४ टक्के, सुधागड तालुक्यातील कोंडगाव धरणात ११ टक्के, घोटवडे धरणात १५ टक्के, ढोकशेत धरणात १५ टक्के, कवेळे धरणात २२ टक्के, उन्हेरे धरणात १६ टक्के, श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरणात ४५ टक्के, कुडकी धरणात ५९ टक्के, रानिवली धरणात २६ टक्के, म्हसळा तालुक्यातील पाभरे धरणात ३९ टक्के, संदेरी धरणात ५९ टक्के, महाड तालुक्यातील वरंध धरणात ३८ टक्के, खिंडवाडी धरणात ३२ टक्के, खैरे धरणात २९ टक्के, कर्जत तालुक्यातील साळोख धरणात ३४ टक्के, अवसरे धरणात १८ टक्के, खालापूर तालुक्यातील भिलवले धरणात ३८ टक्के, कलोते मोकाशी धरणात २६ टक्के, डोणवत धरणात १८ टक्के, पनवेल तालुक्यातील मोरबे धरणात ४४ टक्के, बामणोली धरणात ४९ टक्के, उसरण धरणात ७० टक्के, उरण तालुक्यातील पुनाडे धरणात ३४ टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण भागात पाणीटंचाईच्या झळा जाणवत असून त्या ठिकाणी शासनातर्फे टँकरची व्यवस्था करण्यात आली आहे. असे असले तरीदेखील पावसाळ्याला अजूनही वेळ असल्याने नागरिकांनी पाण्याचा अपव्यय न करता, पाणी जपून वापरण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## स्टोअर रूममधून मटेरियल चोरणाऱ्यास अटक

**पेण** : जेएसडब्ल्यू कंपनीच्या स्टोअर रूममधून फेरोनियबीयम मटेरियल चोरणाऱ्यास वडखळ पोलिसांनी अटक केली आहे. स्टोअर रूममधून सहा हजार रु. किंमतीचे तीन किलो फेरोनियबीयम मटेरियल आरोपी टिल्लू भास्कर भुयान (वय ३२, रा. ओडिशा, सध्या रा. वडगाव, पेण) याने शुक्रवारी चोरून नेले. आरोपीस शनिवारी अटक करण्यात आली आहे. वडखळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नागोठणे-रोहा मार्गावर कच्च्या लोखंडाची वाहतूक; अपघाताचा धोका

**नागोठणे : बातमीदार**

पेण तालुक्यातील जेएसडब्लू कंपनीचा कच्च्या लोखंडाची वाहतूक वडखळ धरमतर येथून नागोठणे-रोहामार्गे साळावपर्यंत रात्रंदिवस होत आहे. या वेळी वाहनामधील लोखंडी गोटी रस्त्यावर पडत असल्यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे.

किशोर म्हात्रे यांनी सांगितले की, ही वाहतूक होत असताना कच्च्या लोखंडी गोटीचा माल रस्त्यावर पडल्यामुळे अनेक दुचाकीस्वारांचे अपघात झाले आहेत. वडखळ धरमतर येथून जेएसडब्ल्यू कंपनीचा कच्चा माल साळाव येथील कंपनीमध्ये मोठमोठ्या ट्रकमधून नेला जात आहे. शिवाय ट्रकचालक हे दारुच्या नशेमध्ये वाहन चालवित असल्यामुळेही अपघात झाले आहेत. बुधवारी (दि.८) सकाळी ६.४५ वा.च्या सुमारास मोठ्या ट्रकमधून रस्त्यावर ही लोखंडी गोटी पडल्यामुळे दुचाकीस्वारांचा अपघात झाल्याचे नागोठणे पोलीस प्रभारी अधिकारी हरेष काळसेकर यांना कळविल्यानंतर त्यांनी आपल्या कर्मचाऱ्याला पाठवून रस्त्यावर पडलेली लोखंडी गोटी साफ करून घेतली. याबाबत तातडीने योग्य ती कारवाई करण्याची मागणी किशोर म्हात्रे यांनी केली आहे.



### नमुना एन. डी.

(नियम ९२ (३) पहा)

परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH/46/CC/M.CAR/2018/89 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH-46-BF0295 चे मालक **मनोहर शंकर धारणे** यांचे तारीख ०८/०४/२०२३ रोजी निधन झालेले आहे.

मी योगिता मनोहर धारणे , पत्ता : मु. ठाणेन्हावे, पो. साजगाव ता. खालापूर, जि. रायगड. सांजगा, साजगाव,महाराष्ट्र - ४१०२०३ उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण च्या निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव - योगिता मनोहर धारणे**
**पत्ता- मु. ठाणेन्हावे, पो. साजगाव ता. खालापूर,**
**जि. रायगड. सांजगा, साजगाव, महाराष्ट्र - ४१०२०३**

परिशिष्ठ ४

### ताबा नोटीस

नियम ८ (१)

( स्थावर मिळकतीसाठी )

( सेक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ नुसार )

ज्या अर्थी

मी, श्री. नितीन जीवन पाटील. मुख्य कार्यकारी अधिकारी दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि पनवेल बँकेचा प्राधिकृत अधिकारी म्हणून, मला दि सिक्युरिटायझेशन अँड रिकंन्सट्रक्शन ऑफ फायानाशियल अॅसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ [५४ चा २००२] अन्वये प्राप्त झालेल्या अधिकार व शक्तीचा वापर करून कलम १३ (१२) व सेक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ चे नियम ३ नुसार दिनांक. ०५/०३/२०२४ रोजी कर्जदार / मोर्गेजर / जामीनदार **सौ. शितल ऋषिकेश पोटे** श्री. स्वरूप ऋषिकेश पोटे आणि सौ. उषा नितीन पवार यांना मागणीच्या नोटीस नुसार २९/०२/२०२४ अखेर रक्कम रु. ६,०४,०६३/- ( अक्षरी सहा लाख चार हजार त्रेसष्ठ रुपये मात्र ) अधिक ०१/०३/२०२४ पासून होणारे व्याज अधिक होणारा खर्च सदर नोटीस मिळाल्यापासून साठ दिवसाचे मुदतीत भरण्याबाबत फर्मावले होते.

कर्जदार / मोर्गेजॉर, मोर्गेजॉर / गॅरेंटॉर आणि जामीनदार यांनी नोटीसीमध्ये मागणी केलेली रक्कम रु. ६,०४,०६३/- ( अक्षरी सहा लाख चार हजार त्रेसष्ठ रुपये मात्र ) अधिक ०१/०३/२०२४ पासून होणारे व्याज अधिक होणारा खर्च दिलेल्या मुदतीमध्ये भरणा केली नसल्याने या नोटीशीने कर्जदार / मोर्गेजॉर, मोर्गेजॉर / गॅरेंटॉर आणि जामीनदार व तमाम जनतेला कळविण्यात येते कि, खाली सही करणार यांनी दि सिक्युरिटायझेशन अँड रिकंन्सट्रक्शन ऑफ फायानाशियल अॅसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकार व शक्ती वापरून विशेषतः सदर कायद्याचे कलम १३ (४) व त्या खालील नियम ८ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारास अनुसरून , खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा प्रतिकात्मक ताबा दि.०७/०५/२०२४ रोजी घेतला आहे.

कर्जदार / मोर्गेजॉर, मोर्गेजॉर / गॅरेंटॉर आणि जामीनदार व तमाम जनतेला या नोटीसीद्वारे ताकीद देण्यात येते की, खाली नमूद केलेल्या मिळकतीबाबत कोणी कोणताही व्यवहार करू नये तो बँकेवर बंधनकारक राहणार नाही आणि असा कोणताही झालेला व्यवहार हा दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि पनवेल यांचे बोज्यासह केला आहे असे समजले जाईल.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन व तपशील**

| वर्णन | पत्ता | मालमत्ता गहाण ठेवणाऱ्या मालकाचे नाव | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील | घर क्र.३८६, पनवेल महानगर पालिके जवळ भुसार मोहल्ला, पनवेल, रायगड | सौ. शितल ऋषिकेश पोटे | २०० चौरस फुट. |

**स्थळ- पनवेल**
**दि. ०७/०५/२०२४**

**सही/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि**

# रेवदंडा, नागाव हद्दीत पाणीटंचाई

## हंडाभर पाण्यासाठी ग्रामस्थांची वणवण

**रेवदंडा : प्रतिनिधी**

ऐन उन्हाळ्यात रेवदंडा, थेरोंडा, चौल, नागाव ग्रामपंचायत हद्दीतील गावात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर आला असून पाण्यासाठी ग्रामस्थांची वणवण होत आहे. अनेक वर्षे पाणीपुरवठा करणारे उमटे धरण गाळाने भरल्याने रेवदंडा, थेरोंडा, चौल, नागाव ग्रामपंचायत हद्दीतील गावांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

उमटे धरणातील पाणी जानेवारी, फेब्रवारी महिन्यात अशुद्ध येते व एप्रिलमध्ये पाण्याची टंचाईस प्रारंभ होतो. उन्हाळ्यात धरणातील पाणी आटल्याने महिलांना पाण्यासाठी वणवण करावे लागत आहे. काही वाडीवस्तीवर डोक्यावर हंडा, कळशी घेऊन दोन दोन किमीची पायपीट करावी लागत आहेत.

समुद्रालगत असलेल्या या चारही ग्रामपंचायत परिसरात विहिरी, हँडपंप तसेच पावसाळ्यातील पाण्याची साठवणूक आदी उपाययोजना राबवित नसल्याचे दिसते. त्याचा परिणाम म्हणून एप्रिल, मे महिन्यात ग्रामस्थांना पाणीटंचाईस सामोरे जावे लागत आहे.

उमटे धरणातून पाण्याची समस्या असेल तर इतर मार्गाने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावा, अशी मागणी ग्रामस्थ करीत आहेत.

# समर कॅम्पमुळे मुलांच्या कलागुणांना मिळतोय वाव

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

परीक्षा संपल्या की, उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये मुलांनी नेमके काय करावे आणि काय करू नये यासाठी पालक जास्तीत जास्त काळजी करताना दिसतात. त्यांची काळजी मिटविण्यासाठी खासगी संस्थांनी समर कॅम्पचे फॅड आणले आहे.

शहरांमध्ये विविध संस्था समर कॅम्पचे आयोजन करत असतात. आठ दिवस ते १५ दिवसांसाठी असणाऱ्या समर कॅम्पमध्ये त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जाते, असा दावा त्या संबंधित संस्थेमार्फत केला जातो.

समर कॅम्पमध्ये चित्रकला, रांगोळी, मनोरंजनात्मक पारंपरिक खेळ (विटी दांडू, गोट्या, सूरपारंब्या, लगोरी), नाट्यीकरण, गोष्टी, गाणी, कथा, कविता, बडबड गीते गायन, मातीकाम यासह जमेल तसे इंग्रजी बोलणे, मैदानी खेळ, व्यक्तिमत्त्व विकास घडविणाऱ्या बाबींचे ज्ञान, सामान्य ज्ञान, मुखवटे अशा साऱ्या गोष्टी शिकविल्या जातात.

**उन्हाचा पारा सकाळपासूच चढत असल्याने मैदानी खेळ खेळता येत नाहीत, मात्र समर कॅम्पच्या माध्यमातून आम्ही अंतर्गत खेळ आम्ही खेळून सुट्टीचा आंनद घेत आहोत.**

**-प्रसाद म्हात्रे, विद्यार्थी**

**मैदानी खेळ उन्हामुळे खेळता येत नसल्याने मुले त्रस्त होती, परंतु समर कॅम्पमुळे अगदी आनंदाने त्या ठिकाणी सर्व मुलांसोबत वेळ घालवत आहेत.**

**- अॅड. गीता म्हात्रे, पालक**



### स्थावर मालमत्ता जप्ती आदेश (उदघोषण)

### महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चा नियम १०७(११)(डी)

### आदेश

ज्या अर्थी दि. पनवेल को. ऑप अर्बन बँक लि. पनवेल या बँकेने खालील थकित कर्जदार यांचे विरुद्ध वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ९१ अन्वये सहकारी न्यायालय रायगड, रत्नागिरी, अलिबाग. यांचे कडून वसुली दाखला मिळवला आहे. आणि थकबाकीदारांची स्थावर मालमत्ता विकून वसुली दाखला प्रमाणे येणे असलेली रक्कम वसुली करण्याची धनको बँकेने विनंती केली आहे. सदर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम १५६ व त्या खालील नियम १०७ अन्वये आदेश देण्यात येत आहे कि, उपरोक्त थकबाकीदारांच्या मालकीची खालील निर्दीष्ट केलेली स्थावर मालमत्ता सदर रक्कम वसुलीसाठी जप्त करण्यात येत आहे. आणि या उदघोषणाच्या तारखेपासुन सदर मालमत्तेचे कोणतेही खाजगी हस्तांतरण करण्यात आले किंवा ती दुसऱ्याच्या स्वाधिन करण्यात आली किंवा तिच्यावर कोणताही भार ठेवण्यात किंवा निर्माण करण्यात आला तर त्या सर्व गोष्टी रद्द होतील/ निरर्थक ठरतील.

आणखी असे सुचित करण्यात येते कि, दि. २९/०२/२०२४ अखेर वरील थकीत कर्जदारांच्या नावासमोर दर्शविलेली थकीत रक्कम रुपये अधिक ०१/०३/२०२४ पासुन कोर्टाच्या आदेशाप्रमाणे होणारे व्याज अधिक होणारा खर्च कर्जाची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत भरणा न केल्यास उपरोक्त जप्त स्थावर मालमत्ता त्यावरील मॉरगेज व अन्य बोज्यासह जाहीर लिलावात विक्रीस काढण्यात येईल .

सदरहु जप्ती आदेश हे वसुली व विक्री अधिकारी दि. पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक यांचे सही शिक्यानिशी दि.०९/०५/२०२४ रोजी दिला आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| अनु.क्र | वसुली दाखला/ हुकुमनामा दिनांक | ज्यांच्या विरुद्ध हुकुमनामा बजाविला आहे त्यांचे नाव | स्थावर मालमत्तेचे वर्णन घर नं./ फ्लॅट नं. | गावाचे/ शहराचे नाव | क्षेत्रफळ | थकीत रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सीसी/आरजीडी/६१/२०२३ दि. ०५/०३/२०२४ | **कर्जदार-** श्री. राजेश दत्तात्रेय कदम. (रा.५७२, दांड आपटा रोड, गणेश मंदिरा जवळ, मु. शिवनगर, पो. मोहोपाडा, ता. खालापूर, जि.रायगड ) **जामीनदार-** १.श्री. कृष्णा सदु पाटील. (रा.१२३, मु. बेलवली, पो. चिखले, ता. पनवेल, जि. रायगड) २.श्री. बळीराम रामदास घरत. (रा.सावली निवास, मु चाभार्ली, पो. मोहोपाडा, ता. खालापूर, जि. रायगड) | ग्रामपंचायत देवळोली हद्दीमधील मालमत्ता क्र. २०२ | देवळोली | ३९९ चौरस फुट. | २९/०२/२०२४ अखेर रु.६,४४,०७०/- अधिक होणारा खर्च |
| २ | सीसी/आरजीडी/५६/२०२३ दि. ०५/०३/२०२४ | **कर्जदार -** श्री. विजय वसंत पावणेकर . ( रा घर नं. १२१८ अ, शिवमंदिराच्या मागे, से. १४, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड ) **सहाय्यक कर्जदार -** श्री. वसंत पदु पावणेकर. ( रा घर नं. १२१८ अ, शिवमंदिराच्या मागे, से. १४, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड ) **जामीनदार-** १.श्री. आशिष भगवान दरे. ( रा मु. कोलवाडी, पो. पडघे ता.पनवेल, जि.रायगड) २. सौ. सुवर्णा वसंत पाटील. ( जयनारायण सोसायटी, ३०३, तिसरा मजला, भगत आळी, गावदेवी मंदिरासमोर, पनवेल ता. पनवेल जि. रायगड ) | पनवेल महानगर पालिका हद्दीतील मौजे कामोठे येथील मालमत्ता क्र. ४९८ | कामोठे पनवेल | ६६३ चौरस फुट | २९/०२/२०२४ अखेर रु.९,२६,९५२/- अधिक होणारा खर्च |
| ३ | सीसी/आरजीडी/८३/२०२१ दि. ०५/०३/२०२४ | **कर्जदार -** श्री. दिनकर बुधाजी मुंढे. ( रा.घर नं. २६०, मधली आळी, मु कोळखे, पो. ओ एन जी सी, ता. पनवेल, जि. रायगड ) **जामीनदार -** १. श्री. फिरोज सत्तार नाईक. (मु कोळखे, पो. ओ एन जी सी, ता. पनवेल, जि. रायगड ) २. श्री. मच्छिंद्र आल्या डाकी. (मु कोळखे- पेठ, पो. ओ एन जी सी, ता. पनवेल, जि. रायगड.) | ग्रामपंचायत कोळखे हद्दीमधील मालमत्ता क्र. २६० | कोळखे | ८४० चौरस फुट | २९/०२/२०२४ अखेर रु.५,१८,२६७/- अधिक होणारा खर्च |
| ४ | सीसी/आरजीडी/८०/२०२१ दि. ०५/०३/२०२४ | **कर्जदार -** श्रीमती. नसीम बानू कासम कच्छी ( मयत तर्फे वारस ) १/१ श्रीमती. निलोफर कासम कच्छी. संज्ञान १/२ श्रीमती. सबरीना कासम कच्छी ( रा.सदनिका क्र.१,पकिजा अपार्टमेंट, कच्छी मोहल्ला पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ) **जामीनदार -** १. श्री. मुनाफ तय्यब कच्छी. (रा मु. युसुफ मंजिल, पहिला मजला, रूमनं. १०४, कच्छी मस्जिद जवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड ) २. श्री. राम अयोध्या सुखदेव प्रसाद. (मयत तर्फे वारस ) ३/१ श्रीमती. गीता राम अयोध्या प्रसाद (रा. मु के एल ४, बिल्डींग नं. २४,रूम नं. ६, से. ४ ई, कळंबोली, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.) | सदनिका क्र.ए-७ तिसरा मजला, इरफान पॅलेस, सी टी एस प्रॉपर्टी नं. २१३/३-ए, २१३/३- बी, कच्छी मोहल्ला, एम जी रोड, पनवेल. | पनवेल | ७३० स्क्रेअर फूट | २९/०२/२०२४ अखेर रु.१०,०४,९७२/- अधिक होणारा खर्च |

**सही/-**
**सुधीर शांताराम गाताडे**
**वसुली व विक्री अधिकारी**
**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०,**
**नियम १९६१ चे नियम १०७ अन्वये**
**दि. पनवेल को-ऑप अर्बन बँक पनवेल.**

# नरेश म्हस्के यांच्या प्रचाराचा झंझावात

## बेलापूरमध्ये बैठकांचे सत्र



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई भाजपा जिल्ह्याच्या वतीने नवी मुंबईत महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांचा प्रचार धुमधडाक्यात सुरू झाला असून नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांनी बेलापूर क्षेत्रातील करावे, दारावे, सीवूड आणि नेरूळ येथील चार प्रभागांमध्ये निवडणूक प्रचार बैठका घेतल्या. या बैठकांना भाजपचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

देशात फिर एक बार मोदी सरकार जनता निवडणार आहे. मोदीजींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी प्रत्येक जागा जिंकणे महत्त्वाचे आहे. ४०० पारचे ध्येय गाठण्यासाठी नरेश म्हस्के यांना मोदीजींसाठी मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष नाईक यांनी बैठकांमधून केले.

नवी मुंबईत भाजपचा कार्यकर्ता सदैव जनतेच्या सेवेमध्ये तत्पर असतो. कोरोनासारख्या संकटकाळात मोठे मदतकार्य उभे राहिले. या काळात आमदार गणेश नाईक तब्बल ७७ वेळा महापालिका मुख्यालयात गेले. नवी मुंबईकरांना सुरक्षित ठेवण्यासाठी प्रशासनाकडून उपाययोजना करून घेतल्या. मोदीजींच्या नेतृत्वाखाली गेल्या दहा वर्षांत झालेल्या विकास कामांची तुलना करताच येणार नाही. देशातील सर्वच घटकांचे कल्याण झाले. महायुतीच्या महाविजयासाठी नवी मुंबई सज्ज झाली आहे. २०१९पासून पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी नवी मुंबईतील भाजप कार्यकर्ता परिश्रम घेतो आहे. पक्षाने दिलेले सर्वच कार्यक्रम आणि उपक्रम मोठ्या संख्येने यशस्वी केले. प्रत्येकाने नरेश म्हस्के यांच्या विजयासाठी काम करावे, असे आवाहन जिल्हाध्यक्ष नाईक यांनी केले.

त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत प्रभाग क्रमांक १०८, प्रभाग क्रमांक १०९, प्रभाग क्रमांक ११०, प्रभाग क्रमांक १११ अशा चारही प्रभागांमधून मताधिक्य देऊन नरेश म्हस्के यांना विजयी करू, अशी ग्वाही या प्रभागातील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी दिली.

## नवी मुंबईत महायुती पदाधिकारी मेळावा




**नवी मुंबई : प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रभर लोकसभेचा रणसंग्राम सुरू असून गुरुवारी (दि. ८) रोजी सानपाडा येथील चंदन बँक्वेट हॉल येथे आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत बेलापूर विधानसभा मधील नवी मुंबई महायुतीच्या पदाधिकारी मेळावा झाला.

या वेळी शिवसेना उपनेते विजय नाहटा, शहर प्रमुख विजय माने, मनसे प्रमुख गजानन काळे, भाजप प्रदेश संयोजक सतीश निकम, रा.कॉ.पा. नवी मुंबई अध्यक्ष नामदेव भगत, रा.कॉ.पा. नवी मुंबई महिला जिल्हाध्यक्षा शोभाताई चौगुले, रा.कॉ.पा. महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सुनिता देशमुख, राष्ट्रीय समाज पक्ष यशवंत सेनेचे अध्यक्ष अभिजित कोकरे, माजी भाजप जिल्हाध्यक्ष रामचंद्र घरत, माजी नगरसेवक दिपक पवार, माजी नगरसेविका सरोज पाटील, भाजपा उपाध्यक्ष डॉ. राजेश पाटील, उत्तर भारतीय मोर्चाचे अध्यक्ष राजेश रॉय, दत्ता घंगाळे, पांडुरंग आमले, राजू तिकोने, विकास सोरटे, जगनाथ जगताप तसेच महायुतीचे असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पुन्हा तिसऱ्यांदा पंतप्रधान बनविण्यासाठी सर्वांनी एकजुटीने महायुतीच्या उमेदवारासाठी काम करावे. तसेच त्या पुढे म्हणाल्या की, युक्रेनमध्ये शिक्षणासाठी भारतातील विद्यार्थी मोठ्या संख्येने गेले होते. जवळपास २० हजार विद्यार्थी युक्रेनच्या वेगवेगळ्या शहरांमध्ये अडकले होते. या विद्यार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या सुरक्षिततेची काळजी वाटत होती. तसंच हे विद्यार्थी देखील मायदेशी परत येण्यासाठी सरकारकडे मदतीची मागणी करत होते. सर्व विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांची मोदी सरकारकडे एकच विनंती आहे की, 'भारत सरकारने आमच्या मुलांना मायदेशी परत आणावे.' या अनुषंगाने रशिया आणि युक्रेन यांच्या युद्धामुळे युक्रेनमध्ये अडकलेल्या भारतीय विद्यार्थ्यांना भारतात परत आणण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या प्रयत्नांच्या माध्यमातून केंद्र सरकारकडून ऑपरेशन गंगा नावाची मोहीम सुरू करण्यात करून त्या अंतर्गत युक्रेनमधील भारतीय दुतावास विद्यार्थ्यांच्या सातत्याने संपर्कात राहून त्यांना पुन्हा भारतात आणण्याचे काम मोदी सरकारकडून करण्यात आले असे महत्वपूर्ण काम मोदी सरकारकडून झाल्याचे आमदार मंदाताई म्हात्रे यांनी सांगितले. तसेच भविष्यात या भागाचा सर्वांगीण विकास करायचा असेल आणि प्रगती साधायची असेल पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचे हात बळकट करायला हवे व अबकी बार ४०० पार फिर एक बार मोदी सरकार हे उद्दिष्ट पूर्ण करायचे असेल तर महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन आमदार मंदा म्हात्रे या वेळी बोलताना केले.

या वेळी बोलताना उपनेते विजय नाहटा यांनी बोलताना सांगितले की, पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाचा सर्वांगीण विकास होत असताना राज्यात युती सरकारच्या माध्यमातुन सामान्य शेतकरी, कामगार, महिला, तसेच युवकांसाठी विविध योजना राज्य सरकार मोठ्या प्रमाणात राबवित आहे. आगामी निवडणुकीत आपन ठाणे येथून नरेंद्र म्हस्के यांना लोकसभेत पाठवून मोदींना पुन्हा तिसर्यांदा पंतप्रधान करायचे असल्याने आपन एकदिलाने काम करून म्हस्के यांना निवडुन आणायचे आहे. या वेळी मोठ्या संख्येने मेळाव्यास महायुतीतील सर्व घटक पक्षातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

## एपीएमसी बाजारात मार्जिनल स्पेसचा वापर करणाऱ्यांवर कारवाई


**नवी मुंबई : बातमीदार**

एपीएमसी बाजारात घडलेल्या अग्नितांडवात मोठ्या प्रमाणात एपीएमसीतील गाळ्यांचे नुकसान झाले होते. त्यामुळे एपीएमसी प्रशासनाने अग्नी अहवाल तयार केला होता. त्या अहवालात बाजारातील अतिक्रमण, गाळ्यांव्यतिरिक्त मर्जिनाल जागेचा अतिरिक्त वापर यामुळे आगीच्या घटना घडत असल्याचा ठपका ठेवला होता. यादरम्यान एपीएमसी फळ बाजारात मर्जीनल जागेचा अतिरिक्त वापर करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे.

जानेवारी ते मे महिन्यात आतापर्यंत १७० जणांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. मुंबई कृषी उत्पन्न फळ बाजार समितीत जानेवारीनंतर आंबा, कलिंगड, पपई इत्यादी फळांचा हंगाम सुरू होतो. विशेषतः हापूसचा हंगाम सुरू झाला असून,बाजारात मोठ्या प्रमाणात लाकडी पेट्या दाखल होत आहेत. आगीची घटना घडली त्यावेळी मोठ्या प्रमाणात पुठ्ठे, गवत आणि लाकडी पेट्या होत्या. त्यामुळे आगीचे लोळ लांबपर्यंत पसरले होते तर २५-३० गाळ्यांचे नुकसान झाले होते. त्यामुळे प्रशासनाने गाळ्यांव्यतिरिक्त सामायिक जागेचा वापर तसेच मालधक्क्यांवर गाडी उभी करून व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. जानेवारीत ५४ , फेब्रुवारी मध्ये ७३, मार्चमध्ये ३०, एप्रिलमध्ये१२, तर मे महिन्यात आतापर्यंत एका व्यावसायिकावर कारवाई करण्यात आली आहे.

## जुईनगर येथे रक्तदान शिबिर

**नवी मुंबई :** श्री स्वामी समर्थ सेवा ट्रस्ट, जुईनगर येथे रायगड ब्लड बँक तसेच डीकसळ यांच्यावतीने या रक्तदाब शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिरात ५० बाटल्या रक्त संकलन करण्यात आले. सध्या रक्ताचा तुटवडा जाणवत आहे. रुग्णांचे हाल होत आहेत. सातत्याने रुग्णालयाकडून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याचे आवाहन केले जात असून, सामाजिक भान बाळगत या शिबिराचे आयोजन केल्याचे आयोजक श्री स्वामी समर्थ सेवा केंद्राचे संतोष सुतार, प्रदीप पाटील यांनी माहिती देताना सांगितले.



## खुशरंग महोत्सवात उमेश चौधरी यांचे उत्स्फूर्त गायन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खुरजा घराण्याचे ज्येष्ठ गायक अस्लम हुसेन खाँ साहेब यांना मानवंदना देण्यासाठी स्वरनिषाद फाऊंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय खुशरंग २०२४ संगीत महोत्सव मोठ्या उत्साहात झाला. डोंबिवली येथे झालेल्या या महोत्सवात रायगडचे सुपूत्र पंडित उमेश चौधरी यांच्या गायन शैलीने रसिक मोहून गेले आणि हा महोत्सव संगीत रसिकांसाठी एक चांगली पर्वणी ठरली.

प्रसिद्ध तबला वादक पंडित निषाद पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या विचार मंथनातून आकाराला आलेली 'स्वर निषाद फाऊंडेशन' हि संगीत संस्था गेल्या आठ वर्षांपासून कार्यरत आहे. त्या अनुषंगाने या महोत्सवाचे उत्कृष्ट आयोजन करण्यात आले होते. यावेळी गायिका अश्विनी धारगळकर यांनी राग जैताश्री सादर केला. गुरु ग्रंथ साहेब मधील या रागाची बहारदार पेशकश त्यांनी केली. त्यानंतरच्या त्यांच्या खमाज रागातील ठुमरीने श्रोत्यांना मोहून टाकले. त्यांना तितकीच अप्रतिम साथ केली ती संवादिनी वादक ओमकार दातार आणि तबला वादक पं. विनायक नाईक यांनी.



त्यानंतर प्रवीण करादगी यांच्या यमन रागाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यमन रागाची जादू ओसरण्यापूर्वीच त्यांनी सादर केलेल्या मीराबाईंच्या भजनाने प्रेक्षक तृप्त झाले. त्यांना तबल्याची जोरकस साथ दिली ती पं. नितीन डेगवेकर यांनी तर संवादिनीची सुरेल साथ होती ओमकार दातार यांची. त्यानंतरचा तिसरा कार्यक्रम होता सारंगीवादनाचा. पं. विनोद पवार यांनी सारंगीच्या सुरांमधून राग मारूबिहाग आणि पारंपरिक जैसलमेरी धून अत्यंत उठावदारपणे सादर केले. त्यांना तितकीच जोरदार साथ केली. तबलावादक पं. निषाद पवार यांनी.

दुसऱ्या दिवशी कार्यक्रमाची सुरुवात अमिता पावगी गोखले यांच्या गायनाने झाली. त्यांनी प्रथम राग मारवा सादर केला. कोमल ऋषभ आणि तीव्र मध्यम स्वरांचा मनाचा ठाव घेणारा हा राग त्यांनी अतिशय नजाकतीने पेश केला. त्यानंतर सादर केलेल्या खमाज रागातील टप्पा व ठुमरीच्या सुरांनी श्रोते मोहून गेले. त्यांना संवादिनीवर मंदार दिक्षित तर तबल्यावर पं. विनायक नाईक यांनी साथ दिली. त्यानंतर पं. नितीन डेगवेकर यांच्या सोलो तबला वादनाने कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढवली. उस्ताद अहमदजान थिरकवाँ साहेब, पं. बापू पटवर्धन यांच्या काही दुर्मिळ गट, कायदे त्यांनी बोल आणि वादन दोन्ही प्रकारे सादर केले. संवादिनी वादक मंदार दिक्षित यांनी तितकीच सुरेल साथ त्यांना दिली.

महोत्सवाची सांगता उस्ताद अस्लम हुसेन खांसाहेबांचे पट्टशिष्य रायगड भूषण पंडित उमेश चौधरी यांच्या गायनाने करण्यात आली. पं. उमेश चौधरींनी राग बिहाग मध्ये दोन्ही मध्यमांचे वैशीष्टपूर्ण प्रयोग,सरगम व जोरकस तानांचे प्रकार करून श्रोत्यांना मोहून टाकले आणि नंतर राग बहार सादर करून नेहमीप्रमाणे कार्यक्रमात बहार आणली. शेवटी भैरवी रागातील 'भवानी दयानी' आणि 'हेचि दान देगा' या भजनाने कार्यक्रमाची सांगता झाली. मात्र हि मैफिल सुरूच रहावी अशी प्रतिक्रिया संगीत रसिकांच्या दादमधून अधोरेखित झाली होती. त्यांना पं. रूपक पवार यांनी तबल्याची तर मंदार दिक्षित यांनी संवादिनीची तर मंगेश चौधरी व अक्षय चौधरी यांनी गायनाची बहारदार साथ दिली.

या महोत्सवाला उस्ताद अस्लम हुसेन खाँसाहेबांच्या स्नुषा आयेशा खान, श्रीकांत पावगी व शुभदा पावगी हे प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित राहिले. या महोत्सवाचे सूत्रसंचालन गणेश कुलकर्णी व वृषाली आमडेकर यांनी केले.

## मतदान करण्याचे पथनाट्यांद्वारे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

जनजागृतीच्या विविध माध्यमांमध्ये पथनाट्य हे अत्यंत प्रभावी माध्यम असून २० मे रोजी होणाऱ्या २५ ठाणे लोकसभा निवडणूकीत जास्तीत जास्त नागरिकांनी मतदान करावे या अनुषंगाने स्वीप कार्यक्रमांतर्गत नवी मुंबई महानगरापालिकेच्या वतीने आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविल्या जात असलेल्या विविध उपक्रमांमध्ये पथनाट्याचाही प्रभावी वापर करण्यात येत आहे.

या थनाट्यांतील कलावंत समुह महापालिका क्षेत्रात संध्याकाळच्या सत्रात गर्दीच्या ठिकाणी जाऊन चौकाचौकात लोकशाहीचा जागर करीत निवडणूकीत मतदान करण्याचे आवाहन करीत आहेत. मनोरंजक पध्दतीने सादर होणारी ही पथनाट्ये मतदान करण्याचे महत्व हसतखेळत पटवून देत आहेत. हा लोकशाहीचा उत्सव



आपण सर्वांनी मिळून साजरा करावयाचा असून मतदान करून आपल्याला संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार बजावयाचा आहे हे लोकांना पथनाट्याव्दारे पटवून दिले जात आहे.

वाशी विभागात रेल्वे स्टेशन परिसर, मिनी सी शोअर सेक्टर ९, सेक्टर ९ मार्केट, सेक्टर १५ मार्केट, सेक्टर १० चौक तसेच नेरूळ विभागात रेल्वे स्टेशन पश्चिम बाजू आणि पूर्व बाजू, सेक्टर १० पूर्व, नेरूळ गाव, नेरूळ सेक्टर २० चौक अशा विविध ठिकाणी झालेली पथनाट्ये बघण्यासाठी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. पथनाट्ये सादर केल्यानंतर नागरिकांनी टाळ्यांची दाद देत कलावंतांच्या सादरीकरणाचे कौतुक केले. या वेळी उपस्थित प्रेक्षक नागरिकांनी डाव्या हाताची तर्जनी उंचावत सामुहिक सेल्फी काढून आपण मतदान करणार असल्याचे दर्शविले.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रात बेलापूर ते दिघा अशा आठही विभागांमध्ये गर्दीच्या ठिकाणी पथनाट्ये सादर करून मतदार जनजागृती केली जात असल्याची माहिती नवी मुंबई महापालिका निवडणूक उपआयुक्त शरद पवार यांनी दिली आहे.

## प्रचार काळात बँड, ढोल-ताशा पथकांना मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी प्रचाराला सुरुवात झाली असून ठिकठिकाणी प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. एकीकडे उमेदवारांच्या प्रचाराचा धुराळा उडतोय तर दुसरीकडे एरव्ही रोजगाराच्या शोधात राहणारे, ढोल-ताशा पथकांना मागणी चांगलीच वाढली आहे. सर्वच पक्षांकडून प्रचाराची सुपारी घेऊन या पथकांना धावाधाव करावी लागत आहे.

सध्या लग्नसराईचे मुहूर्त कमी असून निवडणुकीच्या प्रचाराचा जोर वाढला आहे. त्यातच गावोगावच्या जत्राचा माहोल ही संपला झाले. अलीकडच्या काळात यात्रा उत्सव तसेच लग्नसराईमध्ये सर्व युवकांना डॉल्बीचे वेड असते, परंतु सध्या निवडणुकीची आचारसंहिता असल्याने डॉल्बी सारख्या मोठ्या आवाजातील ध्वनिक्षेपकांवर मोठे निर्बंध आले आहेत. त्यामुळे आपोआपच या सर्व उत्सवांमध्ये पारंपरिक वाद्यांना मागणी वाढली आहे.

एरव्ही काही काम नसल्याने रिकामे बसणारे पथक आता मात्र ओढाताण करून निवडणुकीच्या वातावरण निर्मितीसाठी जावे लागत आहे. सकाळी, दुपारी, सायंकाळी तिसराच सर्वच पक्षांकडून प्रचारासाठी वातावरण निर्मितीसाठी पळावे लागत आहे.

उमेदवार स्वतः येऊन प्रचार करत असल्याने सर्वत्र ढोल ताशाचा आवाज गरजू लागला आहे. पारंपरिक वाद्य वाजवून वातावरण निर्मितीसाठी सर्वच पक्षांकडून प्रचारासाठी सुपारी या पथकांना दिली जात आहे. सध्या लग्न समारंभ, यात्रांमध्ये ढोल, बँड व ट्रॉमपेट आणि डोल-ताशा वादकांना मोठी मागणी आहे. त्यामुळे या कलावंतांना रोजगार मिळत आहे. शहरात ४०पेक्षा बँड पथक असले तरी केवळ ढोल-ताशा वादकांना मागणी आहे. भर उन्हात हे पथक आपली कला सादर करत आहेत.

सकाळी आठ वाजल्यापासून प्रचार फेऱ्या निघत असल्याने त्या संध्याकाळी उशिरापर्यंत सुरू आहेत. ढोल ताशाना मागणी गणेश उत्सवामध्ये अधिक असते. यंदा मात्र निवडणुकामुळे ढोल पथकांना चांगले दिवस आले आहेत.









पनवेल : मावळ लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी खुटारी, रोहिंजण, किरवली, धानसर, तुर्भे, कोयनावेळे, घोट, पडघे येथे पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह प्रचार केला. या वेळी प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक हरेश केणी, माजी जि.प. सदस्य अमित जाधव, माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख रूपेश ठोंबरे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## निवडक

### कशेळे येथे पोलिसांचा रूट मार्च



**कर्जत** : कर्जत पोलीस ठाणे हद्दीतील ग्रामीण भाग असलेल्या कशेळे येथे लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी रूट मार्च घेतला. कर्जत पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने कशेळे गाव, मुख्य बाजारपेठ असा रूट मार्च घेण्यात आला. या रूट मार्चकरिता कर्जत पोलीस ठाण्याचे तीन अधिकारी, १६ अंमलदार तसेच बीएसएफ प्लाटूनचे दोन अधिकारी आणि २५ अंमलदार उपस्थित होते.

### अशोक लोखंडे स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रम

**मुरूड** : पीटसईसारख्या ग्रामीण भागात गोरगरीब जनतेची मुले शिकावी त्यांना उत्तम शिक्षण मिळावे यासाठी कै. अशोक लोखंडे यांनी माध्यमिक शाळा उभारण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती, परंतु शाळा पूर्ण होण्याअगोदरच त्यांचे देहावसन झाले होते. सर्व ग्रामस्थांनी एकत्र येऊन पीटसई येथील माध्यमिक शाळा पूर्ण केली. त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी शाळेचे नावसुद्धा कै. अशोक लोखंडे विद्यालय ठेवण्यात आले. पीटसई विभाग ज्ञानप्रसारक मंडळ यांच्या वतीने त्यांचा ३६वा स्मृतिदिन विद्यालयात साजरा करण्यात आला. विश्वस्थ वसंत लोखंडे यांच्या हस्ते तसबिरीला पुष्पमाला अर्पण करण्यात आली. या वेळी विश्वस्थ महादेव गोळे, चेअरमन खेळू वाजे, माजी सरचिटणीस हृदय रेडीज, कृष्ण पंदेरे गुरुजी, ठाकर गुरुजी, नथुराम अडखळे, गायकवाड गुरुजी, मनवल गुरुजी, शिर्के गुरुजी, मनोहर गायकवाड, रामचंद्र अडखळे, भास्कर गोळे, राजेंद्र भोरावकर, केशव शिंगाडे, कृष्णकांत पवार, सुधीर सावंत, मुख्याध्यापक संतोष रेडीज, शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते.



# नवाबकालीन पोलीस चाळींचा नूर बदलणार

## मुरूडमध्ये नवीन पोलीस इमारत उभारणीसाठी निधी मंजूर

**मुरूड : प्रतिनिधी**

नवाबकालीन पोलीस वसाहतीतील ४७ निवासी खोल्यांची पडझड व जीर्ण झाल्याने पोलीस कर्मचारी त्रस्त झाले होते. त्यामुळेच राज्य सरकारने याची दखल घेऊन नवीन इमारतीकरिता निधी उपलब्ध करून देण्यात आल्याने अखेर नवाबकालीन चाळीतील ४७ खोल्या पाडण्यात आल्या असून लवकरच या ठिकाणी नवीन पोलीस इमारत उभी राहणार आहे.




विविध ठिकाणाहून बदली होऊन पोलीस आपले कर्तव्य बजावण्यासाठी मुरूडमध्ये येत असत, परंतु खोल्या नादुरूस्त असल्याने पोलिसांना इतर ठिकाणी खोल्या भाड्याने घ्याव्या लागतात. समाजसेवक अरविंद गायकर यांनी ही वसाहत नव्याने बांधून मिळावी, अशी मागणी केली होती. त्यानुसार या इमारतीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून पोलीस कल्याण निधीमधून वसाहतीचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षकांनी स्वतः लक्ष घातल्याने वसाहतीसाठी निधी प्राप्त झाला आहे. मुरूड पोलीस ठाणे हद्दीत असणाऱ्या या सर्व खोल्या जमिनदोस्त करण्यात आल्या आहेत. आता लवकरच नवीन खोल्या बांधण्याचे काम सुरू झाले आहे. त्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

याबाबत समाजसेवक अरविंद गायकर यांनी सांगितले की, पोलीस सामान्य नागरिकांचे रक्षण करीत असतात. त्यांना राहण्याची चांगली व्यवस्था व्हावी यासाठी मी मागणी केली होती. लवकरच नव्या स्वरूपात बांधकाम होऊन पोलिसांना राहण्यासाठी घरे उपलब्ध होणार आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी पाठपुरावा करून हे काम मार्गी लावल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले.

## विषारी गावठी दारूविरोधात मानवी हक्क आयोगाकडे तक्रार

**चौक : प्रतिनिधी**

मानवी हक्क आयोगाच्या वतीने नुकतेच शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला खालापूर व कर्जत तालुक्यातील आदिवासी नेते, बांधव उपस्थित होते. या वेळी कर्जत व खालापूर तालुक्यातील विषारी दारू पिऊन अनेक तरुण पिढीबरोबर अनेक संसार उद्ध्वस्त होत असल्याची तक्रार मानवी हक्क आयोग यांच्याकडे करण्यात आल्याचे आदिवासी नेते दिलीप डाके यांनी सांगितले.



भारतीय राज्यघटना कलम ४६नुसार अनुसूचित जाती जमाती यांची काळजी घेणे,त्यांच्या सोयीसुविधा, नागरी सुविधा, याचबरोबर शैक्षणिक, सामाजिक याचबरोबर आर्थिक उन्नतीसाठी सरकारचे प्रयत्न असणे आवश्यक आहे आणि त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी देखील पार पाडणे महत्त्वाचे असताना अनेक ठिकाणी विषारी दारू बनविण्याचे काम सुरू आहे. त्याची रितसर तक्रार पोलीस ठाण्यात करण्याचा प्रयत्न केल्यास दारूबंदी घालण्यास आमचा अधिकार नसून ते काम उत्पादन शुल्क विभागाचे आहे, असे पोलिसांकडून सांगितले जाते, असे तक्रारीत म्हटले आहे.

या दारू उत्पादनावर बंदी घालण्यात यावी, यासाठी मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष ताटेड यांना देण्यात आले असल्याची माहिती आदिवासी नेते दिलीप डाके यांनी दिली.

## खोपोलीत पाणीटंचाईच्या झळा तीव्र

**खोपोली : प्रतिनिधी**

मागील एक दीड उन्हाळी महिन्यात खोपोली शहरातील विविध भागात नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. वाढीव पाणीपुरवठा योजना अंमलात आल्यावर येथील पाणीटंचाई संपुष्टात येईल असे असताना, पाणीटंचाई निर्माण होत असल्याने माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर यांनी चिंता व्यक्त केली आहे. या पाणीटंचाई मागील मुख्य कारण पाणी साठवणूक टाक्यातील वाढलेली पाणी गळती असल्याचे स्पष्ट झाले आहे, मात्र निवडणूक आचारसंहिताचे कारण पुढे करून टाक्यांच्या दुरूस्तीची कामे होत नसल्याचे पालिका प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.

याबाबत दत्ताजी मसुरकर यांनी मुख्याधिकारी पंकज पाटील यांना पत्र लिहून, पाणी, आरोग्य व सार्वजनिक स्वच्छता या मूलभूत गरजा असल्याने त्या संदर्भातील कामे आचारसंहितेच्या कक्षेत येत नाही.

पालिकेच्या मध्यवर्ती पाणीसाठा टाकीतून दिवसाला जवळपास ४० दशलक्ष लिटर पाणी गळती होऊन वाया जात आहे. गळती असल्याने टाक्या पूर्ण क्षमतेने भरत नाहीत व पर्यायाने याचा परिणाम पाणीवितरण कमी दाबाने होत आहे.

एका बाजूला पाताळगंगा नदीच्या रूपाने मुबलक पाणी उपलब्ध असूनही, पंपिंग यंत्रणा, साठवणूक टाक्यातील पाणी गळतीमुळेच येथे पाणीटंचाई निर्माण झाली आहे. दुसरीकडे आचारसंहिताचे कारण पुढे करून आवश्यक दुरूस्ती होत नसल्याने दिवसेंदिवस पाणीटंचाई तीव्र बनत आहे.



यासाठी नगरपालिका प्रशासन प्रमुख व मुख्याधिकाऱ्यांनी ठोस कार्यवाही करून निर्णय घ्यावा व पाणीपुरवठा योजना सक्षम होण्यासाठीच्या कामांना मंजुरी द्यावी, अशी मागणी मसुरकर यांनी केली आहे.

**माजी नगराध्यक्ष मसुरकर यांचे पत्र प्राप्त झाले आहे. याबाबत प्रशासकीय स्तरावर मान्यता व निवडणूक अधिकाऱ्यांना माहिती देऊन कामांना सुरुवात केली जाईल.**

**–डॉ. पंकज पाटील, मुख्याधिकारी, खोपोली**

## कर्जत शहरात महायुतीची बाईक रॅली



**कर्जत : प्रतिनिधी**

मावळ लोकसभेच्या निवडणुकीची खऱ्या अर्थाने रणधुमाळी सुरू झाली आहे. महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ शहरातून बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विशेषतः महिला पदाधिकारी आणि कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

बाईक रॅलीचा शुभारंभ छत्रपती संभाजी महाराज स्मारकाजवळ करण्यात आला. या रॅलीमध्ये शिवसेना कर्जत शहर प्रमुख अभिषेक सुर्वे, संकेत भासे, दिनेश कडू, वैभव सुरावकर, उदय शिंदे, अशोक मोरे, राकेश दळवी, सचिन भोईर, प्रदीप वायकर, सायली शहासने, अरुणा वायकर, नदीम खान, स्नेहा गोगटे आदी उपस्थित होते.

रॅलीची श्रीराम पूल, सुरभी ज्वेलर्समार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक तेथून टिळक चौक, महावीर पेठमार्गे रेल्वेस्थानक तेथून छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ सांगता झाली.

## अलिबागमध्ये विधी साक्षरता शिबिर; जेएएस कर्मचाऱ्यांसह विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

### ✻ कायदेशीर नियमांबाबत मान्यवरांनी केले अवगत

**अलिबाग** : जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जनशिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून कायदेविषयक जनजागृतीसाठी सहाण येथे गुरुवारी (दि.९) विधी साक्षरता शिबिर घेण्यात आले. जनशिक्षण संस्थान रायगडच्या कर्मचारी व विद्यार्थ्यांना कायदेशीर नियमांचे मार्गदर्शन विधी साक्षरता शिबिराच्या माध्यमातून करण्यात आले.



या वेळी संचालक डॉ. विजय कोकणे, लेखनिक प्रणिता मगर, कौशल्य विकास विभाग राज्य समन्वयक प्रतिनिधी वेदांत पवार व जनशिक्षण संस्थान रायगडच्या अकाउंट मॅनेजर प्रतिक्षा चव्हाण, कर्मचारी कल्पना म्हात्रे व सहाय्यक कार्यक्रम अधिकारी वेदांती पाटील, प्रशिक्षक वृषाली भागवत व विद्यार्थी उपस्थित होते.

## कर्जतमध्ये राष्ट्रवादीचा मेळावा; खासदार तटकरेंची उपस्थिती

**कर्जत : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बुधवारी (दि.८)कर्जतमधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या जनसंपर्क कार्यालयात प्रमुख कार्यकर्त्यांशी संवाद मेळाव्याचे आयोजन राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितात करण्यात आले होते.




या वेळी राजिप माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे, प्रदेश सरचिटणीस अशोक भोपतराव, दत्ताजी मसुरकर, प्रदेश प्रतिनिधी भगवान भोईर, जिल्हा उपाध्यक्ष एकनाथ धुळे, शिवाजी खारीक, जिल्हा सरचिटणीस राजेंद्र निगुडकर, विधान सभा अध्यक्ष एच. आर. पाटील, युवक जिल्हा अध्यक्ष अंकित साखरे, सुरेखा खेडकर, तालुकाध्यक्ष भगवान चंचे, खालापूर तालुकाध्यक्ष संतोष बैलमारे, तालुका महिला अध्यक्ष रंजना धुळे, अजय सावंत, तालुका युवक अध्यक्ष स्वप्नील पालकर, महिला शहराध्यक्ष मधुरा चंदन, माथेरान शहराध्यक्ष राजेश दळवी, राजाभाऊ कोठारी, अमोल पाटील, बाबू पोटे, ओबीसी सेल तालुकाध्यक्ष केशव मुने, शहर युवक अध्यक्ष सोमनाथ पालकर, मधुकर घारे, तालुका युवती अध्यक्ष युक्ता भोपतराव आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

खासदार सुनील तटकरे यांनी, माझी कालच निवडणूक झाली. कुठेही न जाता पहिल्यांदा येथे आलो कारण या मतदारसंघावर माझे पूर्वीपासूनच प्रेम आहे. सर्वच मतदारसंघात चांगले मताधिक्य मिळणार आहे. विरोधक काहीही सांगतात. पुन्हा नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यास संविधान बदलतील, असे हास्यास्पद विधान राहुल गांधींनी केले. मनमोहन सिंग पंतप्रधान असताना एक बिल त्यांनी स्वतःच्या हाताने फाडले होते, तसेच त्यांना वाटले असावे. म्हणून ते हे बोलले असावेत, ही आठवण करून दिली. प्रास्ताविकात अशोक भोपतराव यांनी, आपल्या कार्यकर्त्यांना धनुष्य बाणाला मते द्या, आता पूर्ण ताकदीनिशी कार्यकर्ते तयार झाले आहेत, हे आम्ही ठिकठिकाणी उमेदवार श्रीरंग बारणे आणि आमदार महेंद्र थोरवे यांना प्रचारादरम्यान दाखवून दिले. बारणे निवडून येतीलच. त्यांचा कुणाला त्रास नाही किंवा कोणत्याही कामाची त्यांना टक्केवारी द्यावी लागत नाही. त्यांच्यासाठी आम्ही खूप मेहनत घेऊ, असे स्पष्ट केले.

दत्ताजी मसुरकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रमोद देशमुख तर आभार प्रदर्शन संतोष बैलमारे यांनी केले.

## पाली शहरात नालेसफाईची कामे वेगात

**सुधागड : प्रतिनिधी**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीमध्ये नगरपंचायतीतर्फे नालेसफाईच्या कामांना सुरुवात झाली आहे. पावसाळ्यापूर्वी ही सर्व कामे पूर्ण करण्यात येणार आहेत.

श्री बल्लाळेश्वर मंदिरापासून नालेसफाईला सुरुवात झाली आहे. ठरलेल्या नियोजनाद्वारे येथील वेगवेगळ्या ठिकाणची नाले सफाई टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्यात येईल. पाणी बॉटल, प्लॅस्टिकच्या पिशव्या, घरगुती कचरा व गाळ यामुळे येथील बहुसंख्य ठिकठिकाणी नाले व गटारे तुंबली आहेत. नगरपंचायतीचे सफाई कर्मचारी नियमित नालेसफाई करतात. पावसाळ्यापूर्वी होत असलेली नालेसफाई ही अत्याधुनिक यंत्र व जेसीबीच्या साहाय्याने करण्यात येत आहे. त्यामुळे या तुंबलेली गटारे व नाले पूर्णपणे साफ होते. नगरपंचायतीद्वारे कंत्राटी कामगार घेऊन नालेसफाई केली जात आहे. जेसीबी, ट्रॅक्टरचा वापर करून गटारे व नाल्यातील घाण, कचरा काढला जात आहे.


**RAYAT SHIKSHAN SANSTHA'S**
**Veer Wajekar ASC College, Phunde; Uran.**
**- TENDER NOTICE -**

Tenders are invited from reputed firms/companies / Contractors for various internal and repairing work of college building. The detail information of tender such as tender fees, terms, conditions and technical specifications of the tender process is available at college office from 10.05.2024 to 16-05-2024 from 10 am to 5.00 pm. For more details contact to Prin. Dr. P. G. Pawar (8928663853)

**Details of the Projects are as follows**

| Work | Construction Area | Aprox. Cost of Project | Earnest Money Deposit (1%) | Tender Cost (Non refundable) |
|---|---|---|---|---|
| Partition for Yoga room & Commerce dept. | 84.32 sqm | 7,48,000/- | Rs. 7,000/- | Rs. 500/- |
| Partition for Language lab | 31.9 sqm | 1,66,000/- | Rs. 1,600/- | Rs. 200/- |
| Furniture in Language lab | 31.9 sqm | 5,48,000/- | Rs. 5,480/- | Rs. 200/- |
| Partition work for IT Dept. | 51.22 sqm | 2,00,000/- | Rs. 2,000/- | Rs. 1000/- |

**sd/-**
**Principal,**
**Veer Wajekar ASC College, Phunde; Uran.**

**RAYAT SHIKSHAN SANSTHA'S**
**Veer Wajekar ASC College, Phunde; Uran.**
**- TENDER NOTICE -**

Tenders are invited from reputed firms/companies through e-Tendering process for the Ladies Hostel Repair Work & Internal and External Painting Work of College Buildings
The detail information of tender such as tender fees, terms, conditions and technical specifications of the tender process is available on our web site https://edumart.sets.co.in from 10-05-2024 and Tender must be submitted online to this website up to16-05-2024 @ 5.00 pm. For more details contact :- Principal , Dr. P.G. Pawar Mobile No. 8928663853

**Details are as follows-**

| Work | Construction Area | Aprox. Cost of Project | Earnest Money Deposit (1%) | Tender Cost (Non refundable) |
|---|---|---|---|---|
| Ladies Hostel Repair Work (Toilet, Shed, Terrace) | 721 sqm | 10,75,000/- | Rs. 10000/- | Rs. 1000/- |
| Internal & External Painting Work of College Buildings | 6040 sqm | 36,00,000/- | Rs. 36,000/- | Rs. 1000/- |

**sd/-**
**Principal,**
**Veer Wajekar ASC College, Phunde; Uran.**

# हेड, अभिषेक बरसले

## हैदराबादचा लखनऊवर दणदणीत विजय

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

१६६ धावांचे मिळालेले आव्हान केवळ ९.४ षटकांमध्ये पार करीत हैदराबादने लखनऊचा १० गड्यांनी फडशा पाडला. या जबरदस्त विजयासह हैदराबादने गुणतालिकेत तिसरे स्थान पटकावताना प्ले ऑफच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले. ट्रॅविस हेडने १६ चेंडूंत, तर अभिषेक शर्माने १९ चेंडूंत अर्धशतक झळकावत लखनऊला पुनरागमनाची एकही संधी दिली नाही. यासह हैदराबादने आयपीएलमध्ये पहिल्यांदाच लखनऊला नमवले.



लक्ष्याचा पाठलाग करताना हेड आणि अभिषेक यांनी आपल्या लौकिकानुसार चौफेर फटकेबाजी केली. दोघांनी केवळ ५८ चेंडूंत नाबाद १६७ धावा करीत हैदराबादला दणदणीत विजय मिळवून दिला. या दोघांना रोखण्यात लखनऊच्या कोणत्याच गोलंदाजाला यश आले नाही. केवळ ३४ चेंडूंत संघाचे शतक झळकावत हेड-अभिषेक यांनी सामन्याचे चित्र स्पष्ट केले. यंदाच्या आयपीएलमध्ये हैदराबादने दुसऱ्यांदा शतक झळकावले तसेच हेडने दुसऱ्यांदा १६ चेंडूंत अर्धशतक झळकावण्याचा पराक्रमही केला.

हेडने ३० चेंडूंत आठ चौकार आणि आठ षटकारांसह नाबाद ८९ धावांची खेळी केली. अभिषेकने २८ चेंडूंत आठ चौकार आणि सहा षटकारांसह नाबाद ७५ धावांची खेळी केली. या दोघांच्या झंझावातामुळे १० विकेट्स आणि ६२ चेंडू राखून प्रचंड फरकाने विजय साकारला. अवघ्या पाऊण तासात ट्रॅव्हिस-अभिषेक जोडीने लखनऊच्या लक्ष्याचा फडशा पाडला.

त्याआधी प्रमुख फलंदाज अपयशी ठरल्यानंतर आयुष बदोनीने झळकावलेल्या झुंजार अर्धशतकाच्या जोरावर लखनऊने समाधानकारक मजल मारली. अनुभवी वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारने सुरुवातीलाच लखनऊला दोन हादरे दिले, मात्र बदोनीने निकोलस पुरनसह संघाला सावरले. भुवनेश्वरने तिसऱ्या व पाचव्या षटकात अनुक्रमे क्विंटन डी कॉक आणि मार्कस स्टोइनिस यांना स्वस्तात बाद केले. यानंतर लोकेश राहुल व कृणाल पांड्या हेही बाद झाल्याने १२व्या षटकात लखनऊची चार बाद ६६ धावा अशी अवस्था झाली. बदोनीने निकोलस पुरनसह पाचव्या गड्यासाठी ५२ चेंडूंत नाबाद ९९ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. त्यांनी ६३ धावा कुटल्या.

### मंगोलिया संघ टी-२०मध्ये केवळ १२ धावांत गारद

**सानो : वृत्तसंस्था**

आशियाई स्पर्धेद्वारे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करणारा मंगोलियाचा संघ बुधवारी जपानविरुद्ध केवळ १२ धावांत बाद झाला. आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधील ही दुसरी नीचांकी धावसंख्या आहे. जपानने प्रथम फलंदाजी करताना सात बाद २१७ धावांची मोठी धावसंख्या उभारली होती. या आव्हानाचा पाठलाग करताना मंगोलियाचा संघ अवघ्या ८.२ षटकांत गारद झाला.

टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये नीचांकी धावसंख्या नोंदवण्याचा विक्रम आइल ऑफ मॅन या संघाच्या नावावर आहे. हा संघ २६ फेब्रुवारी २०२३ रोजी स्पेनविरुद्ध १० धावांवर बाद झाला होता. जपानकडून १७ वर्षीय डावखुरा वेगवान गोलंदाज काजुमा कातो स्टॅफोर्डने ३.२ षटकांत सात धावांत पाच गडी बाद केले. अब्दुल समदने चार धावांत दोन गडी बाद केले, तर मकोतो तानियामा याने शून्य धावांत दोन गडी बाद केले.

मंगोलियाकडून तूर सुमायाने सर्वाधिक चार धावा केल्या. जपानने हा सामना २०५ धावांनी जिंकला. हा विजय टी-२० क्रिकेटमध्ये धावांच्या फरकाने चौथा मोठा विजय आहे. सर्वाधिक धावांच्या फरकाने विजयाचा विक्रम नेपाळच्या नावावर आहे. नेपाळने आशियाई स्पर्धेत मंगोलियालाच २७३ धावांनी पराभूत केले होते.

## यंदाच्या आयपीएलमधून मुंबई इंडियन्सचे आव्हान संपुष्टात

**मुंबई : प्रतिनिधी**

हैदराबादच्या विजयासह मुंबई इंडियन्स संघाचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. पाच जेतेपदे नावावर असलेल्या मुंबईच्या संघावर २०२२नंतर प्राथमिक फेरीत गाशा गुंडाळण्याची नामुष्की ओढवली. लखनऊने दिलेले १६६ धावांचे लक्ष्य हैदराबादने लीलया पार केले. यासह मुंबई संघ यंदाच्या लीगमधून बाहेर झाला.

हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्स संघ यंदाच्या आयपीएल हंगामातील प्ले ऑफच्या शर्यतीतून बाहेर पडणारा पहिला संघ ठरला. या हंगामात मुंबईची कामगिरी फारशी चांगली राहिली नाही आणि त्याचा फटका संघाला बसला. सर्वच विभागांत चमक दाखवण्यात हा संघ अपयशी ठरला.

हंगाम सुरू होण्यापूर्वी हार्दिक पांड्याला मुंबईने आपल्या चमूत सहभागी करून घेत तोच संघाचे नेतृत्व करेल याची घोषणा केली. रोहित शर्माला कर्णधारपदावरुन काढल्यानंतर सुरू झालेल्या वादापासून पांड्या स्थिरावला नाही. तो दडपणाखाली खेळताना दिसला. त्यामुळे त्याचा परिणाम हार्दिकच्या कामगिरीवर पहायला मिळाला. मुळात हार्दिकच दबावाखाली असल्यामुळे तो संघालाही स्थिर ठेवू शकला नाही.

माजी कर्णधार रोहित शर्मावर या हंगामात कर्णधारपदाचे दडपण नव्हते.



त्यामुळे त्याच्याकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती, मात्र त्यानेही निराशा केली. मुंबईच्या अन्य फलंदाजांनाही या हंगामात पुरेसे योगदान देता आलेले नाही. दुखापतीतून सावरल्यानंतर मुंबईच्या चमूत उशीरा सहभागी झालेल्या सूर्यकुमार यादवने आपल्या शैलीनुसार संघासाठी धावा केल्या.

सध्याच्या आयपीएलमध्ये भारतीय गोलंदाज जसप्रीत बुमराहने १२ सामन्यांत १८ बळी मिळवले आणि तो हंगामातील सर्वाधिक गडी बाद करणारा गोलंदाज आहे. तरीही मुंबईच्या गोलंदाजीत म्हणावी तशी धार दिसली नाही. संघ सर्वस्वी बुमराहवर अवलंबून असलेला पहायला मिळाला व त्याचाच फटका संघाला बसला. बुमराह वगळल्यास दुसरा कोणताही गोलंदाज हा सुरुवातीच्या १५ गोलंदाजांमध्ये नाही.

# चॅम्पियन्स लीग फुटबॉलमध्ये डॉर्टमंडची अंतिम फेरीत धडक

## पॅरिस सेंटजर्मेनच्या पराभवामुळे एम्बापेचे स्वप्न अधुरेच

**पॅरिस : वृत्तसंस्था**

तारांकित आघाडीपटू किलियन एम्बापेचे पॅरिस सेंट-जर्मेन संघाला 'युएफा' चॅम्पियन्स लीग फुटबॉलचे जेतेपद मिळवून देण्याचे स्वप्न पुन्हा अधुरेच राहिले. जर्मन क्लब बोरुसिया डॉर्टमंडने सेंट-जर्मेनवर विजय मिळवताना अंतिम फेरीत धडक मारली. डॉर्टमंडने उपांत्य फेरीमधील दोन्ही टप्प्यांतील लढती १-० अशा फरकानेच जिंकल्या.

एम्बापेचा हा सेंट-जर्मेनकडून खेळताना अखेरचा हंगाम आहे. या हंगामाअखेरीस त्याचा सेंट-जर्मेनसोबतचा करार संपुष्टात येणार असून त्याने पुन्हा नव्याने करार करणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. तो स्पेनमधील बलाढ्य संघ रेयाल माद्रिदशी करारबद्ध होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे, मात्र त्यापूर्वी सेंट-जर्मेनला चॅम्पियन्स लीगचे जेतेपद मिळवून देण्याचे एम्बापेचे ध्येय होते, पण ते साध्य होऊ शकले नाही.

२०१७च्या हंगामापूर्वी सेंट-जर्मेनने एम्बापेला मोनाको संघाकडून तब्बल १८ कोटी ३० लाख डॉलर इतक्या मोठ्या किमतीत खरेदी केले होते. त्यानंतर सेंट-जर्मेन संघाने फ्रान्समधील स्थानिक स्पर्धांमध्ये वर्चस्व गाजवले, मात्र चॅम्पियन्स लीगच्या जेतेपदापासून ते कायम दूर राहिले. यंदाही उपांत्य फेरीचा टप्पा ओलांडण्यात सेंट-जर्मेनचा संघ अपयशी ठरला. डॉर्टमंडने विजय मिळवत १ जूनला इंग्लंडमधील वेम्बली स्टेडियमवर होणाऱ्या अंतिम लढतीतील आपले स्थान निश्चित केले.



उपांत्य फेरीत दोन्ही टप्प्यांतील लढतींत सेंट-जर्मेनचे पारडे जड मानले जात होते, मात्र डॉर्टमंडचा भक्कम बचाव भेदणे एम्बापे आणि त्याच्या सहकाऱ्यांना शक्य झाले नाही. डॉर्टमंडच्या घरच्या मैदानावर झालेल्या पहिल्या टप्प्यातील लढतीत यजमानांसाठी आघाडीपटू निकलस फुलक्रुगने निर्णायक गोल केला होता. दुसऱ्या टप्प्यातील लढतीत सामन्याच्या ५०व्या मिनिटाला अनुभवी बचावपटू मॅट्स हुमल्सने हेडर मारून गोल करीत डॉर्टमंडला आघाडी मिळवून दिली. अखेर त्याचा हा गोल निर्णायक ठरला. त्यापूर्वी सेंट-जर्मेनच्या वॉरन झाएर-एमरीला गोल करण्याची उत्तम संधी होती, पण ती त्याने वाया घालवली. एम्बापेलाही फारसा प्रभाव पाडता आला नाही. त्याने मारलेले फटके डॉर्टमंडचा गोलरक्षक ग्रेगोर कोबेलने अडवले. त्यामुळे डॉर्टमंडने दोन टप्प्यांत मिळून ही लढत एकूण २-० अशा फरकाने जिंकत तिसऱ्यांदा चॅम्पियन्स लीगची अंतिम फेरी गाठली.

## लाजिरवाण्या पराभवानंतर लखनऊ संघाचा कर्णधार राहुलवर मालक भडकले

**हैदराबाद : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये बुधवारी झालेल्या सामन्यात सनरायजर्स हैदराबादकडून लखनऊ सुपर जायंट्सचा लाजिरवाणा पराभव झाला. लखनऊने प्रथम फलंदाजी करताना १६५ धावांची मजल मारली होती. प्रत्युत्तरात हैदराबादच्या सलामी जोडीने केवळ १० षटकांत सामना खिशात घातला. या सामन्यानंतर लखनऊ संघाचे मालक संजीव गोयंका संतापले आणि त्यांची मैदानावरच केएल राहुलबरोबर बाचाबाची झाल्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

या व्हिडीओत लखनऊ संघाचे मालक गोयंका हातवारे करून केएल

**व्हिडीओ व्हायरल**

राहुलवर संतापून बोलत असल्याचे दिसत आहे. राहुल मात्र शांतपणे त्यांचे म्हणणे एकून घेताना दिसतो. स्वतःला सांभाळून राहुल शांतपणे त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देताना दिसत आहे.

लखनऊच्या पराभवामुळे आता गुणतालिकेत त्यांची घसरण होऊन ते सहाव्या स्थानावर आले आहेत. १२ सामन्यांपैकी सहा सामन्यात त्यांचा पराभव झाला आहे. यामुळे संघाला आता क्वालिफाय करणे कठीण झाले आहे.

गोयंका आणि केएल राहुलच्या चर्चेवर प्रतिक्रिया देताना समालोचकानेही नाराजी व्यक्त केली. अशा प्रकारची गंभीर चर्चा ही बंद दाराआड व्हायला हवी. मैदानात इतके कॅमेरे लागलेले असतात, तुम्ही असे हातवारे करून बोलत असाल तर कुठल्यातरी कॅमेऱ्यात तुम्ही कैद होता, मात्र केएल राहुलने शांत राहून अतिशय चांगले उत्तर दिले आहे, असे समालोचक म्हणाला.

## नीरज चोप्रा राष्ट्रीय फेडरेशन चषक स्पर्धेत खेळणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑलिम्पिक आणि विश्वविजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा १२ ते १५ मेदरम्यान भुवनेश्वर येथे होणाऱ्या राष्ट्रीय फेडरेशन चषक स्पर्धेत सहभागी होणार आहे. यासह तब्बल तीन वर्षांनंतर हा स्टार खेळाडू पहिल्यांदाच देशांतर्गत स्पर्धेत खेळेल. २६ वर्षांचा हा स्टार खेळाडू १० मे रोजी प्रतिष्ठित डायमंड लीग सिरीजच्या दोहा येथे होणाऱ्या पहिल्या टप्प्यात आपल्या सत्राची सुरुवात केल्यानंतर भारतात परतण्याची शक्यता आहे.



भारतीय थलेटिक्स महासंघाने ट्वीट केले की, नीरज चोप्रा आणि किशोर कुमार जेना हे भुवनेश्वरमध्ये १२ मेपासून सुरू होणाऱ्या देशांतर्गत स्पर्धेत सहभागी होतील. नीरजचे प्रशिक्षक क्लाउच बार्टोनित्ज यांनीही नीरज भुवनेश्वरमधील स्पर्धेत सहभागी होणार असल्याचे सांगितले. हांगझोउ आशियाई स्पर्धेत रौप्य जिंकणारा २८ वर्षीय किशोर जेन हाही १० मे रोजी दोहा डायमंड लीगमध्ये खेळेल.

नीरजने याआधी १७ मार्च २०२१ रोजी देशांतर्गत स्पर्धेत सहभाग घेतला होता. तेव्हा त्याने ८७.८० मीटर भाला फेकून सुवर्णपदक जिंकले होते. त्यानंतर नीरजने टोकियो ऑलिम्पिकमध्ये ऐतिहासिक 'सुवर्ण' जिंकले.

## हार्दिक पांड्याच्या नेतृत्वावर मुंबई इंडियन्स संघातील वरिष्ठ नाराज

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये सध्या प्ले ऑफसाठी चढाओढ सुरू आहे, पण याचदरम्यान हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील चॅम्पियन मुंबई इंडियन्सचा संघ प्ले ऑफच्या शर्यतीतून बाहेर पडणारा पहिला संघ ठरला. यानंतर आता मुंबई इंडियन्सच्या वरिष्ठ सदस्यांनी कर्णधार हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील संघाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

भारतीय संघाचा कर्णधार असलेल्या रोहित शर्माला मुंबईच्या कर्णधारपदावरून काढून टाकण्याचा एमआयचा निर्णय संघासाठी फारसा फलदायी ठरला नाही. ज्या कर्णधाराने मुंबईला पाच आयपीएलची जेतेपदे मिळवून दिली त्याला बाजूला करीत हार्दिक पांड्याला कर्णधार केले खरे, पण प्रत्येक सामन्यादरम्यान हार्दिकची हुर्यो उडवली.

वृत्तानुसार मुंबई इंडियन्स संघाच्या वरिष्ठ खेळाडूंनी कोचिंग स्टाफला कळवले की, ड्रेसिंग रूममध्ये उत्साहाचे वातावरण नाही आणि याचे कारण म्हणजे हार्दिक पांड्याची नेतृत्व शैली.

एमआयच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, मुंबई इंडियन्सची सध्यस्थिती ही नव्या नेतृत्वामुळे झालेली नाही, तर गेल्या १० वर्षांपासून रोहितच्या कर्णधारपदाची सवय असलेला संघ अजूनही कर्णधार आणि संघाच्या नेतृत्व शैलीच्या बदलाशी जुळवून घेत आहे. नेतृत्व बदल होणाऱ्या संघासाठी ही कायमचे एक समस्या राहिली आहे. खेळामध्ये असे प्रकार सातत्याने घडत असतात.

एका सामन्यानंतर प्रशिक्षक वर्ग आणि काही खेळाडू यांची एक मीटिंग झाली. यामध्ये मुंबई संघाचा पूर्वीपासून भाग असलेले रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव आणि जसप्रीत बुमराह अशा वरिष्ठ खेळाडूंचा समावेश होता. या मीटिंगदरम्यान खेळाडूंनी आपले विचार मांडले आणि संघाची कामगिरी का खालावली आहे, या कारणांवर चर्चा केली. यानंतर हे वरिष्ठ खेळाडू आणि संघ व्यवस्थापनाच्या प्रतिनिधीसोबत व्यक्तिगत संवादही झाला.

दिल्ली कॅपिटल्सकडून झालेल्या पराभवानंतर हार्दिकच्या सामन्यानंतरच्या वक्तव्यामध्ये मॅच अवेअरनेस नसल्याबद्दल संघाचा सर्वाधिक धावा करणारा खेळाडू तिलक वर्मावर टिपण्णी केली. त्यामुळे ड्रेसिंग रूममध्ये वाईट पडसाद उमटले, असे सूत्रांनी सांगितले.

# भारतीय महिला क्रिकेटपटूंनी रचला इतिहास

## बांगलादेशला ५-0ने नमवले

**सिल्हेट (बांगलादेश) : वृत्तसंस्था**

भारतीय महिला क्रिकेट संघाने इतिहास रचताना बांगलादेशचा त्यांच्याच घरात ५-० असा दारूण पराभव केला. भारत आणि बांगलादेश यांच्यात ट्वेंटी-२० मालिका सुरू होती. या मालिकेतील अखेरचा सामना गुरुवारी (दि. ९) खेळवला गेला. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वातील भारताने आपला विजयरथ कायम ठेवत सलग पाचव्या सामन्यात यजमान बांदलादेशला पराभवाची धूळ चारली. या विजयासह पाहुण्या भारताने ५-० असा एकतर्फी विजय नोंदवला.

आगामी काळात होणाऱ्या ट्वेंटी-२० विश्वचषकाच्या दृष्टीने भारतासाठी ही खुशखबर म्हणावी लागेल. महिला ट्वेंटी-२० विश्वचषकाचे वेळापत्रक आयसीसीने जाहीर केले आहे. ३ ते २० ऑक्टोबर या कालावधीत क्रिकेटच्या सर्वांत लहान फॉरमॅटचा विश्वचषक खेळवला जाईल. बांगलादेशची राजधानी ढाका आणि सिल्हेट येथे हे सामने खेळवले जातील.



अखेरच्या सामन्यात भारतीय कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून प्रथम फंलदाजी करण्याचा निर्णय घेतला. स्मृती मानधना (३३), दयालन हेमालथा (३७), हरमनप्रीत कौर (३०) आणि रिचा घोष (नाबाद २८ धावा) अशा सांघिक खेळीच्या जोरावर भारताने निर्धारित २० षटकांत पाच बाद १५६ धावा केल्या. या आव्हानाचा पाठलाग करताना यजमान बांगलादेशचा संघ २० षटकांत सहा बाद केवळ १३५ धावा करू शकला आणि सामना २१ धावांनी गमावला. भारताकडून राधा यादवने सर्वाधिक (३) बळी घेतले, तर तितस साधू (१) आणि आशा सोभनाने (२) बळी घेतले.


जीवेत् शरदः शतम्!

**महेंद्र शिर्के**

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक विनायक नाईक

जीवेत् शरदः शतम्!

**प्रवीण बढे**

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक महादेव यादव

जीवेत् शरदः शतम्!

**धर्मेंद्र म्हात्रे**

यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक संकेत पोटले

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –**मुख्य संपादक**


हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com